नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १४५ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## सरकारी कर्मचाऱ्यांचा संप अखेर मागे!

### सुधारित पेन्शन योजनेसंदर्भात १५ दिवसांत अधिसूचना काढणार; सरकारचे आश्वासन



मुंबई : (स. गांवकरी)

सुधारित निवृत्ती वेतन योजनेसह १८ मागण्यांसाठी राज्यभरातील १८ लाख सरकारी कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप अखेर चौथ्या दिवशी सरकारने दिलेल्या आश्वासनानंतर मागे घेण्यात आला आहे. सुधारित निवृत्ती योजनेसंदर्भात १५ दिवसांत अधिसूचना काढली जाईल, निवृत्तीचे वय ६० करण्याबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन तसेच अन्य मागण्यांबाबत सरकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने हा संप मागे घेण्यात आल्याचे सरकारी निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीने जाहीर केला.

राज्यभरातील सरकारी कर्मचारी २१ एप्रिलपासून संपावर होते. या संप आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने पुढाकार घेऊन दिनांक २२ एप्रिल रोजी मागण्यांवर मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासोबत बैठक पार पडली. या बैठकीत १ मार्च २०२४ पासून राज्याची सुधारित राष्ट्रीय वेतन योजना लागू करण्यात आली आहे. परंतु या संदर्भातील कार्यपद्धती व नियम तसेच बाबत आवश्यक असणारे अधिसूचना प्रस्तुत करण्यात आली नव्हती त्यामुळे एक मार्च २०२४ पासून सेवानिवृत्त झालेल्या ६५०० कर्मचारी शिक्षकांना तात्पुरत्या निवृत्तीवेतनाचे लाभ मिळालेला नाही. सबब संबंधित कर्मचाऱ्यांची मोठी आर्थिक कुचुंबणा हो असल्याची बाब निदर्शनास आणल्यानंतर याविषयीची अधिसूचना पुढील पंधरा दिवसात काढण्याचे आश्वासन देण्यात आले. त्याचप्रमाणे अन्य प्रलंबित मागण्यांसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठकीचे आश्वासन देण्यात आले. अन्य १८ मागण्यांबाबत चर्चा झाली व त्या संदर्भातील गोषवारा असणारे लिखित इतिवृत्त संघटनेला देण्यात आल्यानंतर संप मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

चतुर्थ श्रेणी कर्मचारी व वाहन चालक यांची भरती प्रक्रिया सुरू केली जाईल असे आश्वासन देण्यात आले. चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना भरती प्रक्रियेत प्राधान्य मिळावे यासाठी सकारात्मक विचार केला जाईल असे सरकारकडून देण्यात आलेल्या बैठकीच्या इतिवृत्तात स्पष्ट करण्यात आले. १०:२०:३० वर्षाच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्प्याने लागू करण्याचा विचार करण्यात येईल. राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपालिकांचा सन २००५ पासूनचा आकृतीबंध तयार करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येईल असे स्पष्ट आश्वासन देण्यात आले. सेवानिवृत्तीचे वय ६० करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे नमूद करण्यात आले आहे. १५ मार्च २०२४ चा संचमान्यतेच्या शासन निर्णयातील काही विशिष्ट मुद्द्यांबाबत अडचणी असल्यास त्या शासनाच्या निदर्शनास आणून द्याव्यात, त्यानुसार उपाययोजना करण्यात येतील, असेही आश्वासन देण्यात आले.

या आश्वासनांच्या पार्श्वभूमीवर सरकारी कर्मचारी संघटनांसोबत समन्वय समितीच्या झालेल्या बैठकीत आश्वासनांसंदर्भात चर्चा करण्यात आली. राज्यस्तरावरील प्रतिनिधींनी या सभेत सहभाग घेतला. या सभेत २१ एप्रिलपासून सुरू असलेला बेमुदत संप आंदोलन उद्या २५ एप्रिलपासून संस्थगित करण्यात आल्याची घोषणा समन्वय समितीचे निमंत्रक विश्वास काटकर निमंत्रक यांनी केली.

## थोडक्यात...

### पारंपरिक उद्योगांसाठी मोठी घोषणा

पुणे (स. गांवकरी) : महाराष्ट्रात अनेक पारंपरिक उद्योगांचे जाळे आहे. या उद्योगांमध्ये प्रामुख्याने सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचा (एमएसएमई) समावेश आहे. या पारंपरिक उद्योगांना बळ देण्याची आवश्यकता आहे. कृत्रिम प्रज्ञा (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करून बँका हे काम करतील, अशी घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी शुक्रवारी केली. स्टेट बँकेच्या स्थानिक मुख्यालयाचे उद्घाटन सीतारान यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. या वेळी वित्तीय सेवा सचिव एम. नागराजू आणि बँकेचे अध्यक्ष चल्ला श्रीनिवासलू शेट्टी उपस्थित होते. सीतारामन म्हणाल्या की, महाराष्ट्राची ओळख एमएसएमईसाठी आहे. राज्याच्या पूर्व आणि नैऋत्य भागात अनेक पारंपरिक उद्योग आहेत. हे पारंपरिक उद्योग प्रामुख्याने एमएसएमई क्षेत्रातील आहेत. विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या उद्योगांना बळ द्यायला हवे. यासाठी बँकांनी राज्याच्या विविध भागात जाऊन या उद्योगांना बळ द्यावे. महाराष्ट्राच्या देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्वाचे योगदान आहे. बँकिंग व्यवस्थेपासून दूर असलेले अनेक क्षेत्रे असून, त्यांना पुढे आणण्याची आवश्यकता आहे.

### गायकवाड यांची दिलगिरी

पुणे (स. गांवकरी) : सुमारे ३७ वर्षांपूर्वी कॉम्रेड गोविंद पानसरे यांनी लिहिलेल्या 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्यामुळे बुलढाण्याचे वादग्रस्त आमदार संजय गायकवाड अडचणीत आले होते. राज्यातून चौफेर टीका झाल्यावर अखेर शुक्रवारी आमदार संजय गायकवाड यांनी या प्रकरणी दिलगिरी व्यक्त केली आहे. मात्र ही दिलगिरी व्यक्त करतांनाच या पुस्तकाच्या ( शिवाजी कोण होता? या ) शीर्षकाबद्धलचा आपला आक्षेप कायम असल्याचे आमदार गायकवाड यांनी ठणकावून सांगितले. तसेच या पुस्तकाचे जाहीर वाचन करण्यासाठी बुलढाणा शहरात येणाऱ्यांनी शिवाजी महाराजांचा आदरार्थी उल्लेख करावा, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

### चालकांना इशारा

मुंबई (स. गांवकरी) : मुंबईमध्ये १ मे पासून सर्व टॅक्सी व रिक्षा चालकांना मराठी भाषा अनिवार्य करण्यात आली आहे. याविषयीचा निर्णय परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे. तर दुसरीकडं या निर्णयाला विरोध दर्शवला जात आहे. मात्र मुंबईमध्ये अमराठी टॅक्सी आणि रिक्षा चालकांना मराठी शिकवण्याची भूमिका भारतीय जनता पक्षातर्फे घेण्यात आली आहे. प्रत्येक विधानसभा स्तरावर कार्यालयामध्ये किंवा इतर खाजगी आस्थापनांमध्ये अमराठी रिक्षा, टॅक्सी चालकांना मराठी शिकवलं जाणार असल्याची माहिती, मुंबई भाजपा टॅक्सी रिक्षा असोसिएशनचे अध्यक्ष के.के.तिवारी यांनी दिली. यानंतर मुंबईतल्या अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांनी संपावर जाण्याचा इशारा दिला आहे. ज्यांना मनसेने धडा शिकवण्याचा इशारा देत प्रत्युत्तर दिलं आहे.

### केवायसी पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ

मुंबई (स. गांवकरी) : बँक खात्याचे ई केवायसी केले नसल्यास शिक्षकांना मे महिन्यामध्ये वेतन मिळणार नाही, असे आदेश शिक्षण विभागाने दिल्याने राज्यातील सर्वच शिक्षकांची धावपळ उडाली होती. शिक्षण विभागाच्या या निर्णयाविरोधात शिक्षकांकडून संताप व्यक्त करण्यात येत होता. विद्यार्थ्यांचे निकाल तयार करायचे, निवडणूक कर्तव्यावर हजर राहायचे की बँके खात्याचे ई केवायसी करण्यासाठी बँकेत जायाचे असा प्रश्न शिक्षकांकडून उपस्थित करण्यात आला होता.

## समुद्रात पेरल्या जाताहेत मृत्यूच्या खाणी; जगाचं टेन्शन वाढलं

### ट्रम्प यांच्या 'प्लॅन २' मुळे इराणची झोप उडाली

मुंबई : (स. गांवकरी)



जगाला तिसऱ्या महायुद्धाच्या खाईत लोटण्याची ठिणगी आता होर्मुझ सामुद्रधुनीत पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या संशयास्पद नौका दिसताच त्यांना थेट गोळ्या घालण्याचे आदेश अमेरिकन नौदलाला दिले आहेत. इराणकडून या महत्त्वाच्या समुद्री मार्गात सुरू असलेल्या खाणी पेरण्याच्या हालचाली रोखण्यासाठी ट्रम्प यांनी हे टोकाचे पाऊल उचलले आहे. होर्मुज सामुद्रधुनी हा जागतिक तेल पुरवठ्याचा सर्वात महत्त्वाचा मार्ग आहे. इराण आपल्या वेगवान नौकांचा वापर करून या मार्गावर माईन्स पेरत असल्याचा अमेरिकेचा आरोप आहे. यामुळे जगाचा तेल पुरवठा विस्कळीत होऊन अमेरिकेवर दबाव निर्माण करण्याचा इराणचा प्रयत्न आहे. याला प्रत्युत्तर म्हणून ट्रम्प यांनी दोन स्तरावर रणनीती आखली आहे. इराणच्या माईन्स पेरणाऱ्या कोणत्याही नौकेला न विचारता थेट नष्ट करणे. समुद्रात आधीच पेरलेल्या माईन्स शोधून त्या नष्ट करणे. यासाठी अमेरिका जपानसारख्या मित्रराष्ट्रांची मदत घेण्याच्या तयारीत आहे. अमेरिकेचे संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांनी पेंटागनमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत स्पष्ट केले की, अमेरिकन नौदल सध्या 'लॉक आणि लोडेड' मोडमध्ये आहे. "होर्मुझमधून आता अमेरिकेच्या परवानगीशिवाय कोणतीही हालचाल होणार नाही. इराणच्या जहाजांना पूर्णपणे रोखले जाईल, तर इतर देशांच्या जहाजांना परवानगी घेऊनच प्रवास करावा लागेल," असे त्यांनी ठणकावून सांगितले. या संपूर्ण संघर्षात इस्रायलनेही आपली भूमिका स्पष्ट केली आहे. इराणवर पुन्हा एकदा मोठा हल्ला करण्यासाठी इस्रायल सज्ज असून केवळ अमेरिकेच्या संमतीची वाट पाहत आहे. इस्रायलच्या संरक्षण मंत्र्यांनी दिलेल्या संकेतानुसार, यावेळी केवळ लष्करी तळच नाही, तर इराणच्या ऊर्जा प्रकल्पांनाही लक्ष्य केले जाऊ शकते.

## आंबेनळी घाटात दुचाकी ५०० फूट दरीत कोसळली

अलिबाग : (स. गांवकरी)




महाबळेश्वर कडून पोलादपूरच्या दिशेने येणारी दुचाकी दरीत कोसळल्याने दांपत्याचा मृत्यू झाला. स्थानिक बचाव पथकाने त्यांचे मृतदेह अथक प्रयत्नानंतर बाहेर काढले. मिळालेल्या माहितीनुसार, आंबेनळी घाटातील एका अतिधोकादायक वळणावर स्प्लेंडर बाईक बॅरिकेट्समध्ये अडकलेल्या अवस्थेत आढळून आली. या घटनेवरून बाईकवरील प्रवासी दरीत कोसळल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. यानंतर तात्काळ प्रतापगड रेस्क्यू टीम आणि महाबळेश्वर ट्रेकर्सचे सदस्य घटनास्थळी दाखल झाले आणि युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू करण्यात आली. रेस्क्यू टीमने दोरांच्या साहाय्याने सुमारे 500 फूट खोल दरीत उतरून अत्यंत धोकादायक परिस्थितीन शोधकार्य सुरू केले. अंधार, निसरडे उतार, दाट आणि सुरू असलेला पाऊस यामुळे ही मोहीम अत्यंत कठीण बनली होती. रात्री सुमारे 1 वा 30 मी वाजेपर्यंत सुरू असलेल्या अथक प्रयत्नांनंतर प्रथम पुरुषाचा मृतदेह शोधून बाहेर काढण्यात यश आले. मात्र, प्रतिकूल हवामान आणि वाढत्या धोक्यामुळेउर्वरित बचावकार्य थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला. यानंतर 24 एप्रिल रोजी सकाळी पुन्हा बचावमोहीम सुरू करण्यात आली. तीन तासांच्या अथक मेहनतीनंतर महिलेचा मृतदेहही दरीतून बाहेर काढण्यात यश आले. या दुर्घटनेत मृतांची ओळख मोहन चव्हाण (55) आणि जयश्री चव्हाण (48) रा. सोनगिरवाडी अशी झाली आहे.

## चार मुले जन्माला घाला, त्यातील एक संघाला द्या

### बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्या विधानावरून नव्या वादाची चिन्हं

नागपूर : (स. गांवकरी)

बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांना अंधश्रद्धा निर्मूलन समितीने खुले आव्हान दिले असता त्यांनी नागपुरातच एक वादग्रस्त वक्तव्य केले आहे. देशातील नागरिकांनी चार मुले जन्माला घालायला हवी व त्यातील एका मुलगा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला द्यायला हवा असे ते म्हणाले. श्री आबाजी थत्ते सेवा आणि संशोधन संस्थेद्वारा प्रस्तावित भारतदुर्गा शक्ती स्थळाचा जामठा येथील नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटच्या परिसरात शिलान्यास सोहळ्यादरम्यान ते बोलत होते. त्यांच्या या वक्तव्यामुळे आता नवीन वादाला तोंड फुटण्याची चिन्हे आहेत.

यावेळी बोलताना धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी सत्ता सोडण्याचे ठरविले होते असेदेखील म्हटले. छत्रपती शिवाजी महाराज युद्ध करून



थकले व ते रामदास स्वामींकडे गेले. आता मला जास्त लढायचे नाही व हे मुकूट व सत्ता तुम्ही सांभाळा, असे ते त्यांना म्हणाले. रामदास स्वामी त्यांना म्हणाले की ठीक आहे. मात्र शिष्याचे कर्तव्य हे गुरूच्या आदेशांचे पालन करणे हे आहे. त्यामुळे आता माझी ही सत्ता तुम्ही सांभाळावी, असे त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना म्हटले होते, असा दावा शास्त्री यांनी केला. भारत मातृप्रधान देश आहे. जेव्हा भारतदुर्गा मंदिर बनेल तेव्हा देश शक्तीसंपन्न होईल व अखंड भारत बनेल. पाकिस्तान माता किंवा चीन मातेचा जय असे कधी ऐकले नाही. संपूर्ण जगात फक्त भारतातच मातेचा जयजयकार होतो. जगात महिलांना भोग्य मनले जाते, मात्र भारतात महिलांना पूज्य मानले जाते. भारत देवशक्ती व पुजेकडे परत जात आहे. हे मंदीर पाहून जगातील लोकांना कळेल की भारत शास्त्र व शस्त्रांच्या आधारे चालतो, असेदेखील ते म्हणाले.

### कॉर्पोरेट जिहादविरोधात उग्र भूमिका घ्या

यावेळी गोविंददेव गिरी महाराज यांनी नाशिकमधील घटनेवर भाष्य केले. देशात आपल्या आजुबाजूला व देशाबाहेर अनेक दानव आहेत. त्यांना संपविण्याऐवजी शुद्ध करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. नाशिकमधल्या कॉर्पोरेट कांडानंतर संताप येत नसेल तर आपण मृतप्राय झालो आहोत की जिवंत आहोत याचा विचार करायला हवा. अशा मानसिकतेच्या लोकांविरोधात उग्र होऊन उभे रहावे लागेल. आपल्या संस्कृतीनुसार शक्तीमान होणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

## महापालिकेकडून नागरिकांवर दंडात्मक कारवाई



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

शहर स्वच्छ, सुंदर आणि सुस्थितीत ठेवण्यासाठी महापालिकेने स्वच्छता नियमभंग करणाऱ्यांविरोधात कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली आहे. शहरातील शहाजी रस्ता, नवी पेठ, घास गल्ली, तांबटकर गल्ली आणि गांधी मैदान परिसरात स्वच्छता मोहिमेअंतर्गत सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, उघड्यावर लघुशंका करणारे तसेच कचरा सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर जाळणे याबद्दल दंडात्मक कारवाई करण्यात आली.

शहरात महापालिकेकडून प्रथमच अशा स्वरूपाची कारवाई करण्यात आली. शहरात सार्वजनिक ठिकाणी रस्त्यांवर कचरा जाळण्याचे प्रकार सर्रासपणे घडतात. एकूण सहा जणांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण १७०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला तसेच उघड्यावर कचरा जळणाऱ्याकडून २ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या निर्देशानुसार ही मोहीम राबविण्यात आली. मुख्य स्वच्छता निरीक्षक पी. व्ही. रामदिन यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता निरीक्षक बाळासाहेब विधाते, प्रसाद बाळू उमाप, प्रशांत चांदणे तसेच मुकादम किशोर वैरागर, अमर वैराळ आणि ओंकार साठे यांच्या पथकाने ही कारवाई केली. आयुक्त डांगे यांनी नागरिकांना शहर स्वच्छतेसाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले असून, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे व उघड्यावर लघुशंका करणे, उघड्यावर कचरा जाळणे टाळावे, अन्यथा अशा दंडात्मक कारवाया यापुढे अधिक तीव्र करण्यात येतील, असा इशारा दिला आहे.

शहरातील नगर-मनमाड रस्त्यावरील गुरु कार सजावट या दुकानदाराने उघड्यावरच दुकानातील कचरा जाळल्याने महापालिकेच्या पथकाने दुकानदारास २ हजार रुपयांचा दंड ठोठावला. कुणी उघड्यावर कचरा जाळताना आढळून आले तर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा आयुक्त डांगे यांनी दिला आहे.

महापालिकेने शहरातील प्रमुख रस्त्यांसह बाजारपेठेमध्ये अतिक्रमण हटाव मोहीमही सुरू केली आहे. यामध्ये अनेक विक्रेत्यांच्या हातगाड्या जप्त करण्यात आल्या, फलक हटवण्यात आले. अतिक्रमण हटाव मोहिमेमध्ये महापालिकेने सातत्य ठेवावे अशी नागरिकांची मागणी आहे.

### स्वच्छतेत नागरिकांची साथ हवी: आयुक्त

शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी ओळखून सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे टाळावे. कचरा घंटागाडीतच कचरा टाकावा. स्वच्छता नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे. नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई अधिक तीव्र केली जाईल, असा इशारा महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला आहे.

## भोंदू गडगेबाबाच्या जिल्ह्यात १३ मालमत्ता; २०० चित्रफिती जप्त

संगमनेर : (स. गांवकरी)

सध्या पोलीस कोठडीत असलेला वडगाव पान येथील भोंदू गडगेबाबा याच्यासह त्याची पत्नी, मुलगा व मुलगी अशा चौघांच्या नावावर संगमनेर, अहिल्यानगर, नेवासा, राहाता या ठिकाणी १३ मालमत्ता असल्याचे पोलीस तपासात आढळले आहे. गडगेच्या आश्रमातून दोनशे चित्रफिती जप्त करण्यात आल्या असून, त्यात दिसणाऱ्या लोकांचीसुद्धा पोलीस चौकशी करणार आहेत. आपल्याला गडगेच्या उपचाराने बरे वाटले असे चित्रफितीत सांगणारे लोक खरे रुग्ण आहेत, की गडगेचे लोक आहेत, हेही तपासले जाणार आहे. दरम्यान, फरार असलेला आरोपी डॉ. मोहन पुरी हा गडगेच्या औषध पुरवठ्याचा सूत्रधार असून, त्याच्यावर यापूर्वीच नाशिकमध्ये चार गुन्हे दाखल असल्याने तो आता पोलिसांच्या रडारवर आला आहे. आज, शुक्रवारी संगमनेरमध्ये अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी ही माहिती पत्रकार परिषदेत दिली. पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे या वेळी उपस्थित होते. गडगेचे जप्त करण्यात आलेले व्हिडिओ 'फॉरेन्सिक ऑडिट'साठी पाठवण्यात आले आहेत. त्याची सत्यता पडताळली जाऊन प्राप्त अहवालाचा पुरावा म्हणून उपयोग केला



जाणार आहे. गडगेने स्थापलेला ट्रस्ट नोंदणीकृत असून, त्यावर सात विश्वस्त आहेत. विविध बँकांमध्ये दहा ठिकाणी बाबाची खाती असून, त्यावर पाच ते पन्नास हजारांपर्यंतचे व्यवहार झालेले आहेत. दरम्यान, गडगेला डॉ. मोहन पुरी औषध देत असल्याचे समोर आले आहे. पुरी याच्यावर नाशिक जिल्ह्यात यापूर्वीचे चार गुन्हे दाखल आहेत. त्याचीही पडताळणी केली जाणार आहे. डॉ. पुरी हा संगमनेरमधीलच बी. जी. डेरे आयुर्वेद महाविद्यालयातून उत्तीर्ण झाल्याची कागदपत्रे मिळाली आहेत. मात्र, चार वर्षांची पदवी मिळवण्यासाठी त्याला तब्बल सात वर्षे लागल्याचेही समोर आले आहे. सिन्नर येथे त्याचा औषध कारखाना असून, पोलिसांनी त्या कारखान्यातही तपासणी केली. गडगेचा आश्रम आणि या कारखान्यातून औषधांचे नमुने घेऊन तेदेखील तपासणीसाठी पुढे पाठवण्यात आले आहेत. डॉ. पुरी हा गडगेला ज्याप्रमाणे औषधपुरवठा करत होता.

# थोडक्यात पण महत्वाचे

## धोंडीराम मगर यांचे निधन



वैजापूर (स. गांवकरी) : तलवाडा (ता-वैजापुर) येथील धोंडीराम आबाराव मगर यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले नागवाडी परिसरातील मगरवस्ती येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले त्यावेळी राजकिय धार्मिक, सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पाश्चात भाऊ,दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, असा मोठा परिवार असून वैजापुर पंचायत समितीचे माजी उपसभापती राजेंद्र मगर यांचे ते वडील होते.

## 'मंथन' सामान्य ज्ञान परीक्षेत ऋग्वेद कारंजकर श्रीगोंदा तालुक्यात प्रथम

श्रीगोंदा (स. गांवकरी) : फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'मंथन' सामान्य ज्ञान परीक्षेत श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थी ऋग्वेद अरंजकर याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याने ३०० पैकी २२० गुण मिळवत श्रीगोंदा तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला असून जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत ३५ वा क्रमांक मिळवला आहे. ऋग्वेद हा येथील ज्येष्ठ नागरिक श्री सुनील कारंजकर यांचा नातू असून, शिरगाव (जि. पुणे) येथील आदर्श प्रकाश देवळे माध्यमिक विद्यालयात कार्यरत असलेले साकेत कारंजकर यांचा तो सुपुत्र आहे. या यशासाठी महादजी शिंदे माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ, वर्गशिक्षिका सौ. चैताली शेडगे (राऊत), श्री काझी सर, सौ. आशा उंडे आदी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. ऋग्वेदच्या या यशाबद्दल माजी मंत्री बबनराव पाचपुते, बाबासाहेब भोस, रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय निरीक्षक नवनाथ बोडखे, काकासाहेब वाळुंजकर, कुंडलीकराव दरेकर, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष दत्तात्रय पाचपुते, जिल्हा सचिव पीटर रणसिंग, रामदास ठाकर सर आदी मान्यवरांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

## सूर्य कोपला उन्हाची तीव्रता अन शेतकऱ्यांची दमछाक

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यात तापमानाची तीव्रता प्रचंड प्रमाणात वाढला असुन पारा ४० अंशांवर पोहोचल्याने रब्बी हंगामातील पिकांचे मोठे नुकसान होत आहे.रणरणत्या उन्हामुळे शेतीकामे करताना शेतकऱ्यांची दमछाक होत असून,प्रखर उन्हाचा फटका भाजीपाला आणि फळबागांना बसत आहे.जुन्नर तालुक्यात सध्या कांदा आणि गहू तर उन्हाळी बाजरी देखील काही प्रमाणात काढणी सुरू असून कांदा व गहू काढणी तर उन्हाळी बाजरी काही फुलोऱ्यात,तर काही ठिकाणी कणसांना दाणे लागलेत तर काही काढणीच्या अंतिम टप्प्यात आहे.मात्र,वाढते तापमान आणि मजुरांच्या टंचाईमुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत.दुपारी तापमान ४० अंश सेल्सिअस पर्यंत जाते हे जाळणारे तापमान आणि सायंकाळचे ढगाळ वातावरण यामुळे उकाडा वाढला आहे. अवकाळी पावसाच्या भीतीने काढलेले धान्य आणि चारा सुरक्षित ठिकाणी हलवण्यासाठी शेतकऱ्यांची कसरत सुरू आहे. अति उष्णतेमुळे घेवडा, कलिंगड,काकडी,टोमॅटो,पालेभाज्या आणि तरकारी याशिवाय आंबा,चिक्कू,डाळिंब,आदिवासी भागातील रानमेवा करपू लागला आहे.नवीन लागवड केलेली रोपे कोमेजल्याने उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे.पाणी टंचाई आणि वाढत्या उष्णतेमुळे पोषक तत्त्वांच्या शोषणात अडथळा येत असल्यानेपिकांची वाढ खुंटली आहे. याचा थेट परिणाम बाजार पेठेतील पालेभाज्यांच्या दरांवर होत असून भाव वधारले आहेत.

## डॉ. देवयानी आरोटे यांची पुण्यात सुपर स्पेशालिटीसाठी निवड!



■ अहिल्यानगर जिल्ह्याची पहिली महिला कार्डिओलॉजिस्ट

अकोले (स. गांवकरी) : अहिल्यानगर जिल्हा व अकोले तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरत, डॉ. देवयानी विजय आरोटे (एमबीबीएस, एमडी जनरल मेडिसिन) यांची जिल्ह्यातील पहिली महिला कार्डिओलॉजिस्ट म्हणून पुणे येथे सुपर स्पेशालिटी शिक्षणासाठी निवड झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. लहानपणापासूनच हृदयरोग विषयाची विशेष आवड असल्याने डॉ. देवयानी यांनी कार्डिओलॉजी क्षेत्रात उच्च शिक्षण घेण्याचे ध्येय ठेवले होते. सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी हे स्वप्न साकार केले आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण अहिल्यानगर येथील वर्का इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये झाले, तर माध्यमिक शिक्षण रेसिडेन्शियल कॉलेजमध्ये पूर्ण झाले. त्यानंतर त्यांनी पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील मेडिकल फाउंडेशनमधून एमबीबीएस पदवी संपादन केली. पुढे धुळे येथील वैद्यकीय महाविद्यालयातून एमडी (जनरल मेडिसिन) पूर्ण करून त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात भक्कम पायाभरणी केली. डॉ. देवयानी यांच्या यशामागे त्यांचे वडील विजय आरोटे (मुख्याध्यापक, जानकीबाई आपटे मूकबधिर माध्यमिक विद्यालय, अहिल्यानगर) तसेच संपूर्ण आरोटे कुटुंबाचा मोलाचा पाठिंबा लाभला आहे. त्यांचे हे यश केवळ वैयक्तिक न राहता, ग्रामीण भागातील मुलींसाठी उच्च शिक्षणाची प्रेरणा ठरणारे आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे अकोले तालुका व अहिल्यानगर जिल्ह्याचे नाव उंचावले असून, विविध स्तरांतून त्यांचे कौतुक केले जात आहे.

# झाडे लावा, पृथ्वी वाचवाचा संदेश देत वसुंधरादिन उत्साहात







जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

चाईल्ड फंड इंडिया संस्थेच्या माध्यमातून भाऊसाहेब बोरा आणे माळशेज हायस्कूल,मढ येथे जागतिक वसुंधरा दिवस अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला.पर्यावरण संवर्धनाची जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात रुजवण्यासाठी विविधउपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात गावामध्ये काढण्यात आलेल्या प्रभात फेरीने झाली. "झाडे लावा, पृथ्वी वाचवा","पाणी वाचवा, जीवन वाचवा"अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा उत्साह व पर्यावरणा बद्दलची जागरूकता ही सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली. यानंतर शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. लावलेले प्रत्येक रोप हे भविष्यातील हिरव्या पृथ्वीचे स्वप्न असल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. तसेच पर्यावरण संवर्धन,जलसंधारण व स्वच्छतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

यावेळी प्रसिद्ध व्याख्येते महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष व जेष्ठ पत्रकार रविंद्र भोर यांनी विद्यार्थ्यांना "आमची शक्ती आमची पृथ्वी" या जागतिक संकल्पने नुसार मार्गदर्शन केले पृथ्वी आपली आई आहे,तिचे संरक्षण व जतन करणे ही आपली जबाबदारी आहे" असा भावनिक संदेश दिला. त्यासाठी बदलत्या पर्यावरणाचे अभ्यास करून जीवाष्म इंधनावरील अवलंबित्व कमी करून हवामान बदलाचा सामना करणे आणि अक्षय ऊर्जा म्हणजे सौर ऊर्जा व पवन ऊर्जा यांचा उत्पादन व वापर तिप्पट करणे. या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून पृथ्वीचे सौंदर्य, पर्यावरणाची हानी आणि त्याचे संरक्षण यांचे सुंदर चित्रांद्वारे प्रभावी चित्रण केले.प्रत्येक चित्रातून निसर्गाविषयीचे प्रेम आणि जपण्याची भावना स्पष्टपणे दिसून येत होती.

कार्यक्रमाचे मार्गदर्शन चाईल्ड फंड इंडिया,मढ येथील सिनियर फील्ड ऑफिसर अभिजित मदने यांनी केले.कार्यक्रमाचे एकूण व्यवस्थापन प्रोजेक्ट को- ऑर्डिनेटर मुक्ता गिरी,अजित सोर,प्रवीण जगताप व ज्योती शिवमोरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष मोढवे यांनी प्रभावीपणे केले. बक्षीस वितरण मुख्याध्यापक संजय राणे, रविंद्र भोर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाचे चित्रीकरण मिथून मोजाड यांनी केले,कार्यक्रमाच्या शेवटी विश्वास गालफडे यांनी आभार प्रदर्शन केले.हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी संस्थेच्या कविता घोलप,दिपाली जगताप,योगेश मस्करे व रोहन शेळके तसेच शाळेतील सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांनी मनापासून सहकार्य केले.या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या मनात पर्यावरणा बद्दल प्रेम,जाणीव आणि जबाबदारीची भावना अधिक दृढ झाली.

# टोकण यंत्रासाठीही ९०% अनुदान; शेतकऱ्यांना दिलासा

■ जिल्हा परिषदेच्या कृषी विभागामार्फत भात व हिरवळीच्या खताच्या बियाण्यास अनुदान

ठाणे : (स. गांवकरी)

जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत कृषि विभागामार्फत सन २०२६-२७ च्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना विविध कृषी योजनांच्या माध्यमातून मोठा दिलासा देण्यात येत आहे. भात पिकाचे उत्पादन वाढविणे, जमिनीची सुपिकता सुधारणा करणे तसेच मजूर टंचाईवर मात करण्याच्या उद्देशाने सुधारित भात बियाण्यास ५० टक्के व हिरवळीच्या खताच्या बियाण्यास ९० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. कृषि विभागामार्फत शेतकऱ्यांना तूर व भात पिकासाठी कर्जत-३, कर्जत-७, जया, रत्नागिरी-८ तसेच एमटीयू-१०१० या सुधारित व अधिक उत्पादनक्षम जातींचे बियाणे ५० टक्के अनुदानावर उपलब्ध करून दिले जाणार आहे. या जाती हवामानास अनुकूल असून चांगले उत्पादन देणाऱ्या असल्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच जमिनीची सुपिकता टिकवून ठेवण्यासाठी आणि सेंद्रिय घटकांची वाढ करण्यासाठी धैंचा या हिरवळीच्या खताचे बियाणे प्रति शेतकरी प्रति एकर २० किलो प्रमाणात ९० टक्के अनुदानावर देण्यात येणार आहे.

धैंचा पिकामुळे जमिनीत सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढून पुढील पिकांसाठी पोषक वातावरण निर्माण होते. या योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी आपल्या संबंधित पंचायत समितीच्या कृषि विभागाकडे तात्काळ नाव नोंदणी करावी. अर्जासोबत ७/१२ किंवा ८-अ उतारा, आधार कार्ड तसेच आधारसंलग्न बँक पासबुक यांच्या छायांकित प्रती सादर करणे बंधनकारक राहील. दरम्यान, शेतीमधील वाढत्या मजूर टंचाईचा विचार करून भात पिकाची टोकण यंत्राद्वारे (Dibbler) पेरणी करण्यासाठी यावर्षीपासून ९० टक्के अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे. SRT पद्धतीने भात लागवड करण्यासाठी किमान ५ टोकण यंत्रांची आवश्यकता असते.

# संभाजीनगरमधील घाटी रुग्णालयाला १२ व्हीलचेअरचे दान!

## कणिसे कुटुंबीयांचा समाजाभिमुख उपक्रम



छत्रपती संभाजीनगर :(स. गांवकरी)

छत्रपती संभाजीनगर शहरात सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत कणिसे कुटुंबीयांनी एक स्तुत्य व प्रेरणादायी उपक्रम राबवला आहे. स्वर्गीय श्री धनराज कणिसे व श्री कन्हैया कणिसे यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन म्हणून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व घाटी रुग्णालय येथे १२ व्हीलचेअरचे दान करण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन शिवसेनेचे तालुकाध्यक्ष किसन कणिसे यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रम अत्यंत साध्या पण भावपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी कणिसे कुटुंबीयांच्या सामाजिक जाणिवेचे कौतुक करत अशा उपक्रमांची समाजाला मोठी गरज असल्याचे मत व्यक्त केले. या प्रसंगी नगरसेवक सिद्धांत शिरसाठ, माजी नगरसेवक अशोक सायना, भाजप कार्यकर्ता विशाल दाभाडे, शिवसेना नेते बाबा तायडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांनी या उपक्रमाचे स्वागत करत रुग्णसेवेसाठी हे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. घाटी रुग्णालय हे मराठवाड्यातील एक प्रमुख व मोठे शासकीय रुग्णालय असून येथे दररोज हजारो रुग्ण उपचारासाठी येत असतात. अनेकदा वृद्ध, दिव्यांग किंवा गंभीर अवस्थेतील रुग्णांना हालचालीसाठी व्हीलचेअरची आवश्यकता भासते. अशा परिस्थितीत कणिसे कुटुंबीयांनी दिलेल्या १२ व्हीलचेअरमुळे रुग्णालय प्रशासनाला मोठा दिलासा मिळणार असून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय कमी होणार आहे. यावेळी बोलताना उपस्थितांनी सांगितले की, अशा प्रकारचे उपक्रम समाजात सकारात्मक बदल घडवून आणतात. समाजातील इतर सक्षम व्यक्तींनी व संस्थांनीही पुढे येऊन आरोग्यसेवा क्षेत्रात योगदान देण्याची गरज आहे.

एकंदरीत, कणिसे कुटुंबीयांनी स्वकीयांच्या स्मृती जपत केलेले हे कार्य समाजासाठी आदर्श ठरत असून, सामाजिक जबाबदारीची जाणीव जपणारा हा उपक्रम सर्वत्र कौतुकाचा विषय ठरत आहे.

# जनगणना प्रशिक्षणाचे उद्घाटन; अचूक माहिती संकलनावर भर



श्रीगोंदा: (स. गांवकरी)

राष्ट्रीय जनगणना प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर श्रीगोंदा तालुक्यात जनगणना प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय येथे आयोजित या कार्यक्रमात प्रगणक व पर्यवेक्षकांना माहिती संकलनाच्या विविध बाबींवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तहसीलदार सचिन डोंगरे यांनी सांगितले की, जनगणना ही देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून प्रत्येक नागरिकाची अचूक माहिती नोंदवणे आवश्यक आहे. या प्रशिक्षणाद्वारे प्रगणकांना घरांची माहिती, कुटुंबीयांची नोंद तसेच डिजिटल पद्धतीने माहिती संकलन करण्याबाबत मार्गदर्शन दिले जात आहे. तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागांसाठी स्वतंत्र नियोजन करण्यात आले असून प्रत्येक प्रगणकावर ठराविक घरांची जबाबदारी सोपविण्यात येणार आहे. या कार्यक्रमास श्रीगोंदा नगरपालिका मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत तसेच महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचे प्राचार्य साळवे उपस्थित होते. जनतेने जनगणना मोहिमेत सहकार्य करून अचूक माहिती द्यावी, असे आवाहन तहसीलदारांनी केले. प्रशिक्षणानंतर लवकरच प्रत्यक्ष जनगणना प्रक्रिया सुरू होणार असून या मोहिमेमुळे तालुक्याच्या विकासासाठी आवश्यक असा महत्त्वपूर्ण डेटा उपलब्ध होणार आहे.

# अग्रीपंख फाउंडेशनचा उपक्रम कौतुकास्पद – आनंद भंडारी




श्रीगोंदा : (स. गांवकरी)

स्व. अजित पवार यांच्या नेतृत्वात विकासाचा ध्यास आणि सामान्य माणसांच्या समस्यांची जाणीव होती. त्यांना श्रद्धांजली म्हणून अग्रीपंख फाउंडेशनने राबविलेला 'एक मुठ धान्य अनाथांसाठी' हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले. भविष्यात मुलांमध्ये दातृत्वाची भावना निर्माण करण्यासाठी आणि वंचितांना आधार देण्यासाठी हा उपक्रम शाळांमध्ये दरवर्षी राबविणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. अग्रीपंख फाउंडेशनतर्फे गुरुवारी 'एक मुठ धान्य अनाथांसाठी' या उपक्रमात सहभागी झालेल्या ७२ शाळांचा कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी भंडारी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त शिक्षक भाऊसाहेब वाघ होते.

या प्रसंगी सहभागी सर्व शाळांना उपयुक्त भेटवस्तू देण्यात आल्या, तर दहा शाळांना सन्मानपत्र तसेच प्रत्येकी एक सायकल देऊन गौरविण्यात आले. भंडारी पुढे म्हणाले की, शाळा, विद्यार्थी, खेळाडू आणि भारतीय जवान यांना प्रोत्साहन देण्याची अग्रीपंखची भूमिका उल्लेखनीय आहे. सोशल मीडियाचा अतिरेक कमी करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होणे गरजेचे असून, प्रत्येक शाळेत वाचनालय उभारले पाहिजे.

प्राथमिक विभागाचे जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी सांगितले की, अग्रीपंख फाउंडेशन सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने शाळांना आधार देत चांगले कार्य करीत आहे. माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनीही उपक्रमाचे कौतुक करत अशा कामांची समाजाला गरज असल्याचे सांगितले.

यावेळी उद्योजक संजयकुमार मचे, प्रविण शिंदे, रामदास झेंडे, डी. डी. भुजबळ, विकास पाटील, आबासाहेब जगताप आदींनीही मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अग्रीपंख फाउंडेशनचे विश्वस्त दिलीपराव काटे यांनी केले.

कार्यक्रमाला तहसीलदार सचिन डोंगरे, गटविकास अधिकारी राणी फराटे, गटशिक्षणाधिकारी कुसुमकुमारी कानडी, संदीप सोमवंशी, किसन वऱ्हाडे, एन. टी. शेलार, अंकुश घाडगे, गोपाळराव डांगे, भावना मोहीते आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन विशाल चव्हाण यांनी केले, तर आभार राजकुमार इथापे यांनी मानले.

**वागदारी ट्रान्समिशन लिमिटेड**

**नोंदणीकृत कार्यालय - बीयू.५ए एसएफएस फ्लॅट्स, इन्कम टॅक्स कॉलनी जवळ, आउटर रिंग रोड, पीतमपुरा, दिल्ली ११००३४**

**CIN- U42201DL2025GOI450109**

**सार्वजनिक सूचना**
**वागदारी ट्रान्समिशन लिमिटेडच्या**
**पारेषण परवाना मंजुरी अर्जावर (प्रकरण क्र. ६२/२०२६) सूचना/हरकती आमंत्रित**

१. वागदारी ट्रान्समिशन लिमिटेड पारेषण मंजुरीसाठी अर्ज दाखल केला आहे परवाना आधी महाराष्ट्र वीज नियामक कमिशन खाली विद्युत कायदा, २००३ च्या कलम १४ आणि १५ आणि एमईआरसी (पारेषण परवाना अटी) नियम, २००४ च्या तरतुदींनुसार. माननीय आयोगाने २२ एप्रिल २०२६ रोजी अर्ज दाखल करून घेतला आहे आणि वागदारी ट्रान्समिशन लिमिटेडला विद्युत कायदा, २००३ च्या कलम १५(२) अंतर्गत सार्वजनिक सूचना प्रकाशित करण्याचे निर्देश दिले आहेत.
२. नवीकरणीय ऊर्जा (RE) विजेच्या वहनातील अडथळे दूर करण्यासाठी आणि वहन क्षमता वाढवण्यासाठी, वागदारी ट्रान्समिशन लिमिटेडची स्थापना आंतर–राज्यीय पारेषण प्रणाली मजबूत करण्याकरिता एक विशेष उद्देश वाहन (विशेष उद्देश वाहन) म्हणून करण्यात आली आहे. याअंतर्गत ४००/२०० केव्ही एआयएस वागदारी (जि. सोलापूर) तसेच अनेक सर्किट्सवर संबंधित लाईन्स आणि बेजची व्यवस्था स्थापित केली जाईल . प्रकल्प आहे झाले पुरस्कार प्रदान केला माध्यमातून दर महाराष्ट्र शासनाने निविदा प्रक्रिया समन्वयक म्हणून अधिसूचित केलेल्या पीएफसी कन्सल्टिंग लिमिटेडद्वारे आयोजित स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया.
३. प्रकल्पात खालील बाबींचा समावेश आहे

| अ. क्र. | पारेषण योजनेची व्याप्ती | प्रभावी तारखेपासून नियोजित COD | प्रकल्पाच्या घटकाच्या नियोजित COD वर वसूल करण्यायोग्य उद्धृत पारेषण शुल्काची टक्केवारी | संबंधित घटकाच्या व्यावसायिक कार्यान्वयनाची (सीओडी) घोषणा करण्यासाठी पूर्व. आवश्यक असलेले घटक |
|---|---|---|---|---|
| १. | ३X५०० MVA, ४००/२२० kV ICT आणि ४०० kV पातळीवर १X१२५ MVAr बस रिॲक्टरसह AIS वागदारीची स्थापना.<br>• ४०० / २०० केव्ही, ५०० एमव्हीए, आयसीटी - ०३ नग.<br>• १२५ MVAr, ४०० kV बस अणुभट्टी – १ क्र<br>• ४०० केव्ही लाईन बे - ०४ नग.<br>• ४०० केव्ही आयसीटी बे - ०३ नग<br>• ४०० केव्ही बस रिॲक्टर बे– ०१ नं.<br>• २२० केव्ही लाईन बे – ०४ नग.<br>• २२० केव्ही आयसीटी बे – ०३ नग.<br>**भविष्यातील अवकाश तरतुदी -**<br>• १X५०० एमव्हीए ४००/२२० केव्ही आयसीटीची स्थापना<br>• ४००/२०० केव्ही, ५०० एमव्हीए, आयसीटी – ०१ नं.<br>• ४०० केव्ही आयसीटी बे – ०१ नं.<br>• २२०केव्ही आयसीटी बे – ०१ नं. | एसपीव्ही हस्तांतरणापासून २४ महिने | १००% | योजनेच्या सर्व घटकांचे एकाच वेळी कार्यान्वयन करणे आवश्यक आहे, कारण त्यांचा वापर एकमेकांच्या कार्यान्वयनावर अवलंबून आहे. |
| २. | ४०० केव्ही एआयएस वागदरी (नवीन) ते ७६५ केव्ही एआयएस पुणे (पूर्व) पर्यंत ४०० केव्ही डी/सी लाईन (प्रस्तावित)<br>• ४०० केव्ही, ६३ एमव्हीएआर स्विच्ड लाइन रिॲक्टर ४०० kV AIS वागदारी–०२ Nos वर<br>• ४०० केव्ही, ५० एमव्हीएआर स्विच्ड लाइन रिॲक्टर ७६५ केव्ही एआयएस पुणे (पूर्व) येथे (प्रस्तावित) – ०२ नग<br>• ७६५ केव्ही एआयएस वर ४०० केव्ही एआयएस लाइन बे पुणे (पूर्व) (प्रस्तावित) – ०२ नग | | | |
| ३. | ४०० केव्ही एआयएस वागदरी (नवीन) पासून ४०० केव्ही सोलापूर पूलिंग स्टेशन (सेक्टर–०२) पर्यंत ४०० केव्ही डी/सी लाईन<br>• ४०० केव्ही सोलापूर येथील ४०० केव्ही लाईन बे पूलिंग स्टेशन (सेक्टर–२) – ०२ नग | | | |
| ४. | ४०० kV AIS वागदारी (नवीन) पासून २२० kV AIS वागदारी (प्रस्तावित) पर्यंत २२० kV D/C लाइन<br>• २२० केव्ही एआयएस लाइन बेज २२० केव्ही वर एआयएस वागदारी (प्रस्तावित) – ०२ नग | | | |
| ५. | ४०० केव्ही एआयएस वागदारी येथे सौर जनित्रांसाठी ४०० केव्ही लाईन बेची स्थापना.<br>• ४०० केव्ही लाईन बे – ०४ नग | | | |
| ६. | वागदारी येथील ४०० केव्ही एआयएस येथे सौर जनित्रांसाठी २२० केव्ही लाईन बेची स्थापना.<br>• २२० केव्ही लाईन बे – ०४ नग | | | |
| ७. | ४०० केव्ही एआयएस वागदारी (नवीन) पासून २२० केव्ही एआयएस नारंगवाडी (विद्यमान) पर्यंत २२० केव्ही डी/सी लाईन.<br>• २२० केव्ही एआयएस लाइन बेज २२० केव्ही वर एआयएस नारंगवाडी (विद्यमान) – ०२ नग | | | |

४. टॅरिफ आधारित स्पर्धात्मक बोली (टीबीसीबी) प्रक्रियेनुसार यशस्वी बोलीदाराने अर्जदाराचे अधिग्रहण केले असून, महाराष्ट्र राज्यात सदर आंतर–राज्य पारेषण प्रणालीची स्थापना, संचालन आणि देखभालीसाठी पारेषण परवाना मिळवणे आवश्यक आहे. त्यानुसार, वागदारी पॉवर ट्रान्समिशन लि. ने पारेषण परवाना मिळवण्यासाठी माननीय आयोगासमोर ही याचिका दाखल केली आहे.
५. कमिशन आहे दिग्दर्शित वागदारी संसर्ग मर्यादित प्रसारण परवानगीसाठीच्या अर्जावर जनतेकडून सूचना/आक्षेप मागवणे परवाना माध्यमातून हे सूचना. संपर्क तपशील च्या नोडल व्यक्ती ज्यांच्याकडून अर्जाची प्रत तपासणी किंवा खरेदीसाठी मिळवता येईल, त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत:
a. **नाव** : श्री. विनोद कुमार
b. **अर्जाची प्रत पाहणी किंवा खरेदीसाठी मळिवण्याचा पत्ता** : केसीसी बिल्डकॉन प्रायव्हेट लिमिटेड, ८ मजला, टॉवर–ए, एम३एम अर्बाना बिझनेस पार्क, सेक्टर ६७, गुरुग्राम, हरियाणा १२२००१
c. **तपासणी किंवा खरेदीची वेळ**: कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:०० ते सायंकाळी १७:०० च्या दरम्यान
d. सविस्तर अर्ज कागदपत्रे (इंग्रजीमध्ये) ₹१००/- रोख किंवा DD / चेकद्वारे भरल्यावर CD सोबत वागदारी ट्रान्समिशन "मर्यादित" देय रक्कम नवी दिल्ली येथे देय आहे.
e. ज्या वेबसाईटवरून अर्जाची प्रत विनामूल्य डाउनलोड करता येईल, त्या वेबसाईटचा पत्ता : https://kccbuildcon.co.in/
६. प्रकाशित केलेल्या सार्वजनिक सूचनेला प्रतिसाद म्हणून, ज्या कोणालाही सूचना/आक्षेप नोंदवायचे आहेत, ते इंग्रजी किंवा मराठी भाषेत लेखी स्वरूपात अपलोड करून सादर करू शकतात. 'ई–सार्वजनिक सल्लामसलत' MERC वेबसाइटवरील टॅब ( www.merc.gov.in/e-public-consultation). हे वैशिष्ट्य वापरण्यात काही अडचण आल्यास, संबंधित हितधारकांनी संपर्क साधावा . कॅन संपर्क मर्क कार्यालय वर मोबाईल क्रमांक : ८९२८०७१५२२ किंवा वर ईमेल आयडी: सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० च्या दरम्यान suggestions@merc.gov.in वर पाठवा .
७. ज्या व्यक्तीने सूचना आणि आक्षेप अपलोड केले आहेत 'ई–सार्वजनिक सल्लामसलत' टॅबने त्याच्या सबमिशनची कोणतीही हार्ड कॉपी दाखल करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तीकडे इलेक्ट्रॉनिक सुविधा नाही माध्यमे कॅन फाइल त्यांचे सूचना आणि आक्षेप मध्ये अ कठीण प्रत यांना उद्देशून **'सचिव', महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एमईआरसी), १३ वा मजला, सेंटर नं. १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई-४०000५, सोबत श्री. डी. के. वालेचा, केसीसी बिल्डकॉन प्रा. लि., (सीओओ, केसीसी बिल्डकॉन प्रा. लि., ८ वा मजला, टॉवर-ए, एम3एम अर्बाना बिझनेस पार्क, सेक्टर ६७, गुरुग्राम, हरियाणा १२२००१, ईमेल: dkvalecha@kccbuildcon.co.in )** यांच्यावर नोटीस बजावल्याचा पुरावा. पाहिजे वाहून नेणे प्रेषकाचे पूर्ण नाव, टपालाचा पत्ता आणि ईमेल पत्ता (असल्यास). यानंतर प्राप्त झालेल्या सूचना आणि / किंवा आक्षेप **१७:०० वाजता २५ मे २०२६ रोजी** विचारात घेतले जाणार नाही. इतर कोणत्याही माध्यमातून दाखल केलेल्या सूचना/आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.
८. वागदारी ट्रान्समिशन लिमिटेड प्रत्येक आक्षेपाला/टिप्पणीला उत्तर देईल. तीन दिवसांच्या आत मिळाले च्या त्याची पावती पण नाही नंतर पेक्षा **२८ मे २०२६ २५ मे २०२६** पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व आक्षेपांसाठी/टिप्पण्यांसाठी .

**एसडी /-**
**देवेंद्र कुमार वालेचा,**
**सीओओ (प्रशिक्षण आणि विकास)**

**ठिकाण : दिल्ली**
**दिनांक : २५.०४.२०२६**

# थोडक्यात पण महत्वाचे




## ASUS कडून ‘ExpertBook Ultra’ लॉंच

नवी दिल्ली (स. गांवकरी) : तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीची कंपनी ASUS ने भारतीय बाजारपेठेत आपला नवीन फ्लॅगशिप बिझनेस लॅपटॉप ‘ExpertBook Ultra’ सादर केला आहे. एआय-शक्तीवर चालणारा हा Copilot+ पीसी व्यावसायिक, CXO आणि उद्योग नेत्यांसाठी विशेषतः डिझाइन करण्यात आला असून, यासोबतच कंपनीने ‘ExpertBook P’ सिरीजचाही विस्तार जाहीर केला आहे. ‘चिंतामुक्त व्यवसाय’ या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवत ASUS ने कार्यक्षमता, सुरक्षा आणि टिकाऊपणाचा संगम साधण्याचा प्रयत्न केला आहे. ‘ExpertBook Ultra’ हा अत्यंत हलका आणि प्रीमियम लॅपटॉप असून त्याचे वजन अवघे ०.९९ किलोपासून सुरू होते. AZ31B मॅग्नेशियम-ॲल्युमिनियम मिश्रधातूपासून बनवलेल्या या डिव्हाइसला एरोस्पेस आणि फॉर्म्युला-१ दर्जाची मजबुती देण्यात आली आहे. 9H हार्डनेस असलेल्या नॅनो-सिरेमिक कोटिंगमुळे त्याची टिकाऊपणा अधिक वाढवण्यात आली आहे. यामध्ये Intel चा नवीनतम Core Ultra Series 3 प्रोसेसर, प्रगत GPU आणि NPU यांचा समावेश असलेला हेटेरोजिनियस एआय कम्प्युटिंग प्लॅटफॉर्म देण्यात आला आहे.

## नेस्ले इंडियाची दमदार कामगिरी; दशकातील सर्वाधिक त्रैमासिक वाढ




नवी दिल्ली (स. गांवकरी) : ग्राहक-केंद्रित धोरण आणि ब्रँडमध्ये वाढीव गुंतवणुकीच्या जोरावर नेस्ले इंडियाने चालू आर्थिक वर्षाच्या चौथ्या तिमाहीत गेल्या जवळपास दशकातील सर्वाधिक वाढ नोंदवली आहे. दुहेरी अंकी विक्री-परिमाण (Volume) वाढीमुळे कंपनीची एकूण कामगिरी अधिक मजबूत झाली असून, देशांतर्गत विक्रीने ₹६,४४५ कोटींचा विक्रम गाठला आहे. कंपनीच्या संचालक मंडळाने ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचे आर्थिक निकाल मंजूर केले. चौथ्या तिमाहीत एकूण विक्रीत २३.४% तर देशांतर्गत विक्रीत २३.१% वाढ नोंदवली गेली. EBITDA मार्जिन २६.३% इतके सुदृढ राहिले. कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक मनीष तिवारी यांनी सांगितले की, “जाहिरातींवरील खर्चात ५०% पेक्षा अधिक वाढ करूनही आम्ही मजबूत नफाक्षमता राखली आहे. ग्राहकांपर्यंत अधिक प्रभावी पोहोच, उत्पादनांचे प्रीमियमीकरण आणि संसाधनांचे शिस्तबद्ध व्यवस्थापन यामुळे ही वाढ साध्य झाली.” कंपनीचा प्रमुख ब्रँड ‘मॅगी’ने बाजारातील आपले अग्रस्थान कायम ठेवले असून ‘किट-कॅट’ आणि ‘नेस्कॅफे’ या ब्रँड्सनीही वेगाने बाजारपेठेतील हिस्सा वाढवला आहे. सर्व उत्पादन गटांनी या वाढीत सकारात्मक योगदान दिले.

## मलेरिया दिनानिमित्त मेडिकव्हर हॉस्पिटल्सचा जनजागृतीवर भर

पुणे (स. गांवकरी) : Medicover Hospitals, पुणे यांनी जागतिक मलेरिया दिनानिमित्त मलेरियाबाबत जनजागृती वाढवण्याचा ठाम संकल्प व्यक्त केला आहे. मलेरिया हा आजही सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने गंभीर प्रश्न असून, विशेषतः ज्या भागात डासांची उत्पत्ती वाढीस लागते अशा ठिकाणी त्याचा धोका अधिक असतो. हा आजार टाळता आणि बरा करता येण्यासारखा असला तरी जागरूकतेचा अभाव आणि उपचारात होणारा विलंब यामुळे अनेकांना त्याचा फटका बसत आहे. मलेरिया हा संसर्गजन्य आजार असून तो संक्रमित मादी ॲनोफिलीस डासांच्या चाव्यामुळे पसरतो. ताप, थंडी वाजणे, डोकेदुखी, घाम येणे आणि अशक्तपणा ही त्याची प्रमुख लक्षणे आहेत. योग्य वेळी उपचार न घेतल्यास हा आजार गंभीर रूप धारण करून शरीरातील महत्त्वाच्या अवयवांवर परिणाम करू शकतो. या निमित्ताने Dr. Rizwan Malik, पब्लिक हेल्थ स्पेशालिस्ट, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, पुणे यांनी सांगितले, “मलेरिया हा पूर्णपणे टाळता आणि बरा करता येणारा आजार आहे. मात्र जागरूकतेचा अभाव आणि उपचारात होणारा विलंब यामुळे तो अजूनही धोकादायक ठरत आहे. लवकर निदान आणि योग्य वेळी वैद्यकीय उपचार घेतल्यास जीव वाचू शकतो. डासजाळ्यांचा वापर, स्वच्छता राखणे आणि साचलेले पाणी टाळणे यासारख्या सोप्या उपायांनी मोठा फरक पडू शकतो. मलेरियाच्या निर्मूलनासाठी समुदायाचा सहभाग अत्यंत आवश्यक आहे.”

## टँकरग्रस्त भागांमध्ये पाणीपुरवठ्यासाठी जिल्हा प्रशासनाची तत्पर व्यवस्था

ठाणे (स. गांवकरी) : जिल्ह्यातील टँकरग्रस्त गावांमध्ये नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत आवश्यक त्या ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असल्याची माहिती ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रकाश सासे यांनी दिली. सध्या शहापूर तालुक्यात २० गाव, ८६ पाडे असे एकूण १०६ गाव पाड्यांमध्ये २६ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. तसेच मुरबाड तालुक्यात १ गाव व ३ पाड्यांसाठी १ टँकर कार्यरत आहे. या माध्यमातून टँकरग्रस्त भागांतील नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून करण्यात येत आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर उद्भवणाऱ्या पाणीटंचाईच्या समस्येवर मात करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आवश्यक नियोजन केले असून, पाणीपुरवठ्यात कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी संबंधित यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली आहे. टँकर पुरवठ्याचे नियोजन काटेकोरपणे राबविण्यात येत असून, आवश्यक त्या ठिकाणी तात्काळ उपाययोजना करण्यात येत आहेत. “ग्रामस्थांना मुबलक व स्वच्छ पाणी मिळावे यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज आहे. ज्या ठिकाणी पाणीटंचाई निर्माण होते, त्या ठिकाणी तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नागरिकांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी प्रशासन सातत्याने प्रयत्नशील आहे,” असे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी सांगितले. जिल्ह्यातील टँकरग्रस्त भागांमध्ये पाणीपुरवठा सुरळीत राहावा यासाठी प्रशासनाकडून नियमित पाहणी व नियंत्रण ठेवण्यात येत असून नागरिकांच्या गरजेनुसार पुढील उपाययोजना करण्यात येणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

## उन्हाळी बाजरी फुलोऱ्यात

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील जवळ पास सर्वच भागातील गावांमध्ये उन्हाळी बाजरीचे पीक सध्या फुलोऱ्यात आले आहे.तर आगात बाजरीचे पीक दाणेदार कणसांनी बहरले असून लवकरच वेटाळणी सुरु होणार आणि चांगले उत्पन्न देणारे असल्याने या परिसरातील शेतकरी दरवर्षी उन्हाळ्यात बाजरीचे पीक घेत आहेत. या वर्षी पाऊस चांगला पडल्याने माणिकडोह,,वडज, पिंपळगाव जोगा,नेतवड आणि  चिल्हेवाडी धरणात मुबलक पाणी उपलब्ध आहे.सर्वच धरणातून उजवा व डावा कालवा तसेच मीना,कुकडी, पुष्पावती व मांडवी नदीला शाश्वत पाणी उपलब्ध होत असल्याने कालव्याने आणि नदीच्या किनाऱ्यावरची अनेक गावे उन्हाळ्यात बाजरीचे पीक घेत आहेत.

# ‘मिशन भरारी’ अंतर्गत विद्यार्थी इस्रो अभ्यासदौऱ्यासाठी

ठाणे : (स. गांवकरी)




ठाणे जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या ‘मिशन भरारी’ या अभिनव शैक्षणिक उपक्रमांतर्गत निवड झालेल्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांच्या अभ्यासदौऱ्यास मा. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखविण्यात येणार आहे. हा शुभेच्छा समारंभ दिनांक २७ एप्रिल, २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हा नियोजन भवन, ठाणे येथे आयोजित करण्यात आला आहे. ‘मिशन भरारी’ या उपक्रमाचे औपचारिक अनावरण प्रजासत्ताक दिनाच्या औचित्य साधून दि. २६ जानेवारी, २०२६ रोजी करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेतून जिल्हास्तरावर निवड झालेल्या ५९ गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी दि. २७ एप्रिल २०२६ ते १ मे २०२६ या कालावधीत देशातील नामांकित वैज्ञानिक केंद्रांना शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले आहे.

हा अभ्यासदौरा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या संकल्पनेतून आणि मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांचे मार्गदर्शनातून राबविण्यात येत असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक /वैज्ञानिक संधी उपलब्ध होणार आहेत. विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष अनुभवातून विज्ञान आणि तंत्रज्ञान समजून घ्यावे, तसेच मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने या अभ्यासदौऱ्याची आखणी करण्यात आली आहे. जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासनाकडून सातत्याने अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांना प्रोत्साहन दिले जात असून ‘मिशन भरारी’ हा त्याचाच एक महत्त्वपूर्ण भाग आहे.

या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांना विमान प्रवासाची संधी मिळणार असून तिरुअनंतपुरम व कन्याकुमारी येथील विविध वैज्ञानिक व ऐतिहासिक स्थळांना भेट देण्यात येणार आहे. विक्रम साराभाई अवकाश केंद्र, थुंबा इक्वेटोरियल रॉकेट लॉन्चिंग स्टेशन, केरळ सायन्स अँड टेक्नॉलॉजी म्युझियम व प्रियदर्शिनी प्लॅनेटेरियम यांसारख्या ठिकाणी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळणार आहे. तसेच स्वामी विवेकानंद स्मारक, थिरुवल्लुवर पुतळा व इतर पर्यटन स्थळांनाही भेट दिली जाणार आहे. या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवणे, शैक्षणिक गुणवत्ता उंचावणे तसेच विज्ञान व आधुनिक तंत्रज्ञानाबाबत जिज्ञासा निर्माण करणे हा आहे. विद्यार्थ्यांना वैज्ञानिक संशोधन, अवकाश विज्ञान व आधुनिक प्रयोगशाळांचा प्रत्यक्ष अनुभव मिळून त्यांच्या भविष्यातील शैक्षणिक वाटचालीस नवी दिशा मिळणार असल्याची माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी दिली. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे तसेच विविध मान्यवर व अधिकारी-कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.

‘मिशन भरारी’ अंतर्गत सन २०२५-२६ या अभ्यास दौऱ्यासाठी जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून एकूण ५९ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. यात अंबरनाथ तालुक्यातून १६ विद्यार्थी (मराठी माध्यम १२ व उर्दू माध्यम ४), भिवंडी तालुक्यातून १२ विद्यार्थी (मराठी माध्यम ११ व उर्दू माध्यम १), कल्याण तालुक्यातून १० विद्यार्थी (सर्व मराठी माध्यम), मुरबाड तालुक्यातून १० विद्यार्थी (सर्व मराठी माध्यम) तसेच शहापूर तालुक्यातून ११ विद्यार्थी (सर्व मराठी माध्यम) यांचा समावेश आहे. एकूण निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ५४ विद्यार्थी मराठी माध्यमातील (२५ मुले व २९ मुली) तर ५ विद्यार्थी उर्दू माध्यमातील (२ मुले व ३ मुली) आहेत. अशा प्रकारे एकूण २७ मुले व ३२ मुलींचा समावेश असलेला ५९ विद्यार्थ्यांचा गट या शैक्षणिक अभ्यास दौऱ्यासाठी सहभागी होणार आहे.

““मिशन भरारी’ हा उपक्रम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी नवे दालन उघडणारा आहे. या अभ्यासदौऱ्यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञान, संशोधन व आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार असून त्यांच्या आत्मविश्वासात निश्चितच वाढ होईल. सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांना या शैक्षणिक सहलीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा, तुमची ही भरारी भविष्यात मोठ्या यशाकडे नेणारी ठरो,” असे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी सांगितले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या क्षमतेला नवे क्षितिज मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## 'इन्स्टिट्यूशनल-ग्रेड' क्रिप्टो ट्रेडिंग सुविधा सुरू

मुंबई : (स. गांवकरी)



सुरक्षेला सर्वाधिक प्राधान्य देणाऱ्या आणि ग्राहकांच्या सोयीचा विचार करणाऱ्या 'बिटडेल्टा इंडिया' या क्रिप्टो ट्रेडिंग प्लॅटफॉर्मने आज भारतात अधिकृतपणे सुरुवात केली आहे. ही कंपनी भारत सरकारच्या 'फायनान्शिअल इंटेलिजन्स युनिट' (FIU-IND) कडे नोंदणीकृत असून, भारतीय गुंतवणूकदारांना सुरक्षित, शिस्तबद्ध आणि विश्वासार्ह व्यवहार करता यावेत या मुख्य उद्देशाने ती या मार्केटमध्ये उतरली आहे. थोडक्यात सांगायचे तर, आता भारतीयांना जागतिक दर्जाची सुरक्षा आणि सरकारी नियमांचे पालन करणाऱ्या एका विश्वासार्ह प्लॅटफॉर्मवर डिजिटल मालमत्तेचे व्यवहार करता येतील. भारत हे जगातल्या अशा देशांपैकी एक आहे जिथे 'क्रिप्टो' किंवा डिजिटल चलनाचे मार्केट खूप वेगाने वाढत आहे. सध्या भारतात जवळपास ११.९ कोटी लोकांनी यामध्ये नोंदणी केली असून, आता फक्त मोठ्या शहरांमधीलच नाही तर लहान शहरांतील (Tier-2 आणि Tier-3 शहर) लोकही यात मोठ्या उत्साहाने भाग घेत आहेत. जसजसे हे मार्केट वाढत आहे, तसतसा लोकांचा दृष्टिकोनही बदलत आहे. आता लोकांना फक्त 'क्रिप्टो विकत घेता येणे' एवढेच महत्त्वाचे वाटत नाही, तर ज्या कंपनीकडून आपण हे व्यवहार करत आहोत ती किती सुरक्षित आहे, विश्वास ठेवण्यासारखी आहे का? आणि तिचे नियम किती कडक आहेत, याला लोक जास्त महत्त्व देऊ लागले आहेत. थोडक्यात, आता लोक केवळ गुंतवणुकीसाठी नाही तर 'सुरक्षित गुंतवणुकीसाठी' चांगल्या प्लॅटफॉर्मच्या शोधात आहेत.

## समावेशक कौशल्य परिसंस्थांसाठी नेत्यांचे आवाहन

### पुण्यात ‘जेंडर इन्क्लुजन व स्किल डेव्हलपमेंट’ विषयावरील आशियातील पहिल्या युनेस्को चेअरचे उद्घाटन

पुणे : (स. गांवकरी)



भारताच्या कौशल्य व शिक्षण क्षेत्रासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठत, सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी (SSPU), पुणे येथे ‘जेंडर इन्क्लुजन व स्किल डेव्हलपमेंट’ विषयावरील आशियातील पहिल्या युनेस्को चेअरचे उद्घाटन करण्यात आले.

हे उद्घाटन केंद्रीय कौशल्य विकास व उद्योजकता राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) तसेच शिक्षण राज्यमंत्री श्री जयंत चौधरी यांच्या हस्ते पार पडले. या उपक्रमाद्वारे समावेशक, भविष्याभिमुख आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक कौशल्य परिसंस्था उभारण्याच्या भारताच्या बांधिलकीला अधोरेखित करण्यात आले.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे तसेच नॉर्वेच्या भारतातील राजदूत मोनिका नागेलगॉर्ड या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. या युनेस्को चेअरचे नेतृत्व SSPU च्या प्रो-चॅन्सलर डॉ. स्वाती मुजुमदार करत असून, कौशल्य विकास क्षेत्रातील त्यांच्या दूरदृष्टीमुळे या उपक्रमाला विशेष दिशा मिळाली आहे. SSPU ने उद्योग-संलग्न कौशल्य प्रशिक्षणाचा अभिनव मॉडेल विकसित केला असून, वंचित घटकांतील युवक-युवतींना मोठ्या प्रमाणावर रोजगाराभिमुख प्रशिक्षण दिले आहे. या उपक्रमांतर्गत रोबोटिक्स, ऑटोमेशन, सेमीकंडक्टर तंत्रज्ञान, प्रगत उत्पादन आणि संरक्षण तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांत सुमारे १०,००० विद्यार्थिनींना प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यांना आकर्षक नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

सध्या SSPU मध्ये मेकॅट्रॉनिक्स, स्मार्ट व शाश्वत ऊर्जा, डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), मशीन लर्निंग (ML) यांसारख्या उच्च-वाढीच्या क्षेत्रांत २१ पदवी, ९ पदव्युत्तर आणि पीएच.डी. कार्यक्रम सुरू आहेत. याशिवाय आर्किटेक्चर, डिजिटल मार्केटिंग, फिनटेक, लॉजिस्टिक्स, रिटेल आणि पोषणशास्त्र यांसारखे अभ्यासक्रमही उपलब्ध आहेत.

SSPU ने २०२४ आणि २०२५ च्या NIRF क्रमवारीत ‘स्किल युनिव्हर्सिटी’ श्रेणीत देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

श्री जयंत चौधरी यांनी SSPU च्या या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, “अशा उपक्रमांमुळे देशातील युवकांमधील कौशल्य दरी कमी होण्यास मोठी मदत होईल.”

आदिती तटकरे यांनी वंचित महिलांपर्यंत कौशल्य प्रशिक्षण पोहोचविण्याचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, “यामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास, स्वावलंबन आणि दीर्घकालीन सक्षमीकरणाला चालना मिळते.”

## विविध मागण्यांसाठी शेतकरी संघटनेचा रास्ता रोको

वैजापुर : (स. गांवकरी)




कांदयाला कवडीमोल भाव, शेतीमालाचे रखडलेले पंचनामे यासह विवीध मागण्यांचे निवेदन देन शेतकरी संघटनेसह तालुक्यातील शेतकऱ्यांचावतीने गंगापुर चौफुली येथे रास्ता रोको आंदोलन केले. मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवून शेतकऱ्यांनी कांद्याची लागवड केली होती. कांदा लागवड करुन आर्थिक समस्येवर मात करता येऊ शकते परंतु ऐन कांदा काढणीनंतर कांदयाचे भाव कमी झाल्याने मोठ्या अपेक्षेने लागवडीसाठी केलेला खर्च मिळणे देखिल कठीण झाले आहे. त्यातच ऐन कांदा काढणीच्या वेळी झालेला अवकाळी पाऊस त्यामुळे शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास हिरावून घेतला झालेल्या नुकसानीचे पंचनामे वेळेवर होईनात त्यामुळे निराश झालेला बळीराजाने अखेर शासन दरबारी मदत मागीतली परंतु त्याचाही काही उपयोग होत नाही. निवडणूकीच्यावेळी मोठमोठी आश्वासने देणारे नेतेही यावेळी शेतकयांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करतात त्यामुळे अखेर शेतकऱ्यांना आक्रमक पवित्रा घ्यावा लागला यावेळी आमदार प्रा. रमेश बोरणारे व तरसीलदार यांना निवेदन देण्यात आले असून सदर निवेदनात म्हणटले आहे की, सध्या कांद्याला फक्त २५० ते ५०० रु. प्रति क्विंटल भाव मिळत आहे प्रत्यक्ष उत्पादन खर्च २००० रुपयापेक्षा जास्त आहे त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.

जेव्हा कांद्याचे भाव जास्त होते तेव्हा शासनाने ४०% निर्यात शुल्क आकारून मोठ्या प्रमाणात महसुल गोळा केला परंतु आता शेतकरी संकटात असतांना शासनमात्र अनुदान देध्यासाठी टाळाटाळ करत आहे. असे निवेदनात म्हवरले असून शेतक्यांच्या मागण्या मान्य न झाल्यास शेतकरी मोठे आंदोलन करतील असा इशाराही यावेळी संतप्त शेतकऱ्यांनी दिला. यावेळी शेतकरी संघटना तालुका अध्यक्ष गणेश तांबे, हिंदवी जनक्रांती अध्यक्ष अजय पाटील साळुंखे,तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष प्रकाश बापु ठुबे,जिल्हा अध्यक्ष धनगर कृती समीती बाळासाहेब जानराव,माजी सरपंच नारायण पवार,सरपंच दत्ता गायकवाड,वैभव सावंत,वाल्मिक गीरी, बाबासाहेब ठुबे,दत्ता नरहरी,रोहित साबदे,महेश तांबे,अजय मोटे, राहुल कोतकर,संदीप नरहरे, अक्षय गायकवाड,रामदास तांबे,बद्रीनाथ चव्हाण,पवन चव्हाण,योगेश जाधव, विठ्ठल मामा गवळी,राहुल शिंदे,गणेश बाहुले, सोमनाथ तांबे,महेश गुंजाळ, दादासाहेब भराडे,पवन चव्हाण, योगेश जाधव,सुनिल गायकवड,सह हजारो शेतकरी रस्ता रोको आंदोलनाला उपस्थित होते.

## जिल्हास्तरीय कृषि निविष्ठा संनियंत्रण समितीची सभा संपन्न

ठाणे : (स. गांवकरी)

जिल्हास्तरीय कृषि निविष्ठा संनियंत्रण समितीची सभा दि. 22 एप्रिल 2026 रोजी जिल्हाधिकारी, ठाणे डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे संपन्न झाली. या सभेस समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, सहअध्यक्ष तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी रामेश्वर पाचे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, कृषी विकास अधिकारी मुनीर बाचोटीकर, मोहीम अधिकारी महेश बनकर, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक बालाजी शिंदे, विस्तार अधिकारी (कृषि) बी. डी. जावीर, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे विभागीय व्यवस्थापक नितीन जाधव, राष्ट्रीय केमिकल फर्टिलायझर्सचे उपव्यवस्थापक

> ■ “खरीप हंगामात रासायनिक खताचे लिंकिंग होणार नाही याची दक्षता घ्या” – जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ

विकास कांबळे, ठाणे जिल्हा ॲग्रो डीलर्स असोसिएशनचे अध्यक्ष समीर ठाकरे तसेच कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सभेच्या प्रारंभी सदस्य सचिव मुनीर बाचोटीकर यांनी उपस्थितांचे स्वागत करून सभेच्या कामकाजास सुरुवात केली. ठाणे जिल्ह्यात सध्या 174 किरकोळ व 22 घाऊक खत विक्री केंद्र, 156 बियाणे विक्री केंद्र तसेच 152 कीटकनाशक विक्री केंद्र कार्यरत असल्याची माहिती त्यांनी दिली. रासायनिक खतांची विक्री ePOS मशीनद्वारे तसेच बियाण्यांची विक्री ‘साथी’ पोर्टलद्वारे केली जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# खत वितरणाबाबत केंद्रीय समितीचा पाहणी दौरा

ठाणे : (स. गांवकरी)



ठाणे जिल्ह्यात भविष्यात लागू होणाऱ्या ॲग्री स्टॅक आयडी प्रणालीच्या अनुषंगाने खत वितरण प्रक्रियेत होणाऱ्या बदलांचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय समितीने दि. २१ एप्रिल, २०२६ रोजी भिवंडी तालुक्यातील पडघा येथे पाहणी दौरा केला. या दौऱ्यात समितीच्या सदस्या सरीता तिरूमला आणि महेश वाकोडे यांनी प्रत्यक्ष भेट देत सध्याच्या प्रणालीचे परीक्षण केले.

या भेटीचा मुख्य उद्देश पीओएस (e-Point of Sale) मशीनला ॲग्री स्टॅक आयडीशी लिंक करून शेतकऱ्यांच्या जमीन धारणेनुसार खत वितरण कसे करता येईल, याबाबत प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेणे हा होता. समितीने पडघा येथील दोन कृषी सेवा केंद्रांना भेट देऊन तेथील कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी कृषी विकास अधिकारी मुनिर बाचोटीकर व मोहीम अधिकारी महेश बनकर उपस्थित होते. समिती सदस्यांनी संबंधित विक्रेत्यांशी संवाद साधत सध्या सुरू असलेल्या आधार-आधारित खत वितरण पद्धतीबाबत माहिती घेतली.

पाहणी दरम्यान समिती सदस्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत सध्याच्या पद्धतीत येणाऱ्या अडचणी, अनुभव आणि अपेक्षा जाणून घेतल्या. शेतकऱ्यांनी आधार-आधारित प्रणालीमुळे खत वितरणात पारदर्शकता वाढल्याचे नमूद केले; मात्र काही तांत्रिक अडचणींचाही त्यांनी उल्लेख केला. यावेळी समितीने स्पष्ट केले की, भविष्यात ॲग्री स्टॅक आयडी प्रणाली लागू झाल्यानंतर खत वितरण अधिक शिस्तबद्ध आणि अचूक होईल. शेतकऱ्यांच्या जमीन धारणेची नोंद प्रणालीशी जोडली गेल्यामुळे त्यानुसारच खताचे वितरण केले जाईल. यामुळे गैरवापराला आळा बसेल तसेच प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या हक्काचे खत वेळेत मिळण्यास मदत होईल.

नवीन प्रणालीमुळे कृषी सेवा केंद्रांवरील विक्रेत्यांना खत विक्री करताना अधिक सुलभता मिळणार असून, अनावश्यक तांत्रिक अडचणी कमी होतील, अशी माहिती समितीने दिली.या पाहणी दौऱ्याच्या माध्यमातून संबंधित यंत्रणेला आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. भविष्यात खत वितरण अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि शेतकरी-केंद्रित करण्यासाठी ॲग्री स्टॅक आयडी प्रणाली महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास समितीने व्यक्त केला.

# नगरसेवक आदेश भगत यांनी कर्मचाऱ्यांना घेतले फैलावर

ठाणे : (स. गांवकरी)



ठाणे महापालिकेतील वाढत्या लोकसंख्येचे शहर असलेल्या दिवा शहरात प्रभाग क्र. २७ मधील अस्वच्छतेवर नगरसेवक आदेश भगत यांनी आपला संताप व्यक्त केला आहे. दिवा शहरात स्वछता व साफसफाईचा पूर्णतः बोजवारा उडालेला दिसून येत आहे. दिवा शहरातील प्रभाग क्रमांक २७ मध्ये वाढत्या अस्वच्छतेमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ लागले असून परिसरात अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग, तुंबलेली गटारे आणि अस्वच्छ रस्त्यांमुळे रहिवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या गंभीर समस्येची दखल घेत नगरसेवक आदेश भगत यांनी संबंधित प्रशासनावर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. नगरसेवक आदेश भगत यांनी सांगितले की प्रभागातील स्वच्छता व्यवस्था पूर्णपणे कोलमडली असून, नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. आदेश भगत यांनी प्रशासनाला तात्काळ स्वच्छता मोहीम राबवून कचरा उचलणे, गटारांची साफसफाई करणे आणि परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली. तसेच नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही असा इशाराही दिला आहे. प्रभाग क्र २७ मधील मुंब्रादेवी कॉलनी, पोस्ट ऑफिसरोड, समर्थ नगर भागात तर कित्येक दिवस साफसफाई केली जात नसल्याच्या अनेक तक्रारी येऊ लागल्या असल्याने आज ठाणे महापालिकेच्या घनकचरा विभागाचे ठेकेदार व कर्मचाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतलेले पहावयास मिळाले. स्थानिक नागरिकांनीही नगरसेवकांच्या भूमिकेचे स्वागत करत प्रशासनाने त्वरित कारवाई करावी अशी मागणी केली आहे.



ठाणे, दिवा : दिनांक 20/4/2026 रोजी भूमाफियांनी दिवा, साबेगाव भागातील शेतकऱ्यांवर जबरदस्तीने दाखल करण्यात आलेले गुन्हे तात्काळ मागे घेण्याबाबत दिवा मनसेचे विभाग अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी मागणी केली आहे. पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 अंतर्गत दाखल करण्यात आलेले कलम 15 व 17 अंतर्गत गुन्हा दाखल केलेले असून दाखल केलेल्या गुन्ह्यामध्ये नंबर 2, 10 व 14 मजकुरामध्ये चुकीच्या पद्धतीने काही शेतकऱ्यांची नावे टाकण्यात आलेली आहेत सदर जमिनीवर काही भूमापियांनी पत्र्याचं कंपाउंड मारून त्याच्यावर कांदळवनाची कत्तल करून तेथे भराव टाकत आहेत शेतकऱ्यांना त्या जागेमध्ये प्रवेश देखील दिली जात नाही या बाबत वारंवार शेतकऱ्यांनी मुंब्रा पोलीस स्टेशन व तहसील कार्यालयात तक्रार देखील दिली आहे.

## थोडक्यात बातम्या...

### रुग्णालयाच्या बाथरूममध्ये २९ वर्षीय नर्सची आत्महत्या

जामखेड (स. गांवकरी) : जामखेड शहरातील लोंढे हॉस्पिटलमधील बाथरूममध्ये एका नर्सने आत्महत्या केली. शबनम दस्तगीर सय्यद (वय २९) असे या मृत नर्सचे नाव आहे. याबाबत त्यांचे वडील दस्तगीर सय्यद (वय ५५, रा. पोकळे वस्ती, जामखेड) यांनी दिलेल्या खबरीवरून जामखेड पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली. दस्तगीर सय्यद यांच्या खबरीनुसार, त्यांची मुलगी शबनम दस्तगीर सय्यद ही लोंढे हॉस्पिटलमध्ये नर्स म्हणून काम करीत होती. गुरुवारी (दि. २३) सकाळी १० वाजता ती नेहमीप्रमाणे कामावर गेली होती. सकाळी साडेदहा वाजता ती बाथरूममध्ये गेली, मात्र बराच वेळ ती बाहेर आली नाही. त्यामुळे स्टाफने दरवाजा तोडून पाहिले असता, ती बेशुद्धावस्थेत आढळून आली. तिला ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. नगरसेवक राजू गोरे यांनी फोनवर सय्यद यांना कळवले. दुपारी अडीच वाजता डॉक्टरांनी शबनम हिचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले. याप्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. नर्स शबनम दस्तगीर ही विवाहित असून, तिला पाच व सहा वर्षांची दोन मुले आहेत. घटस्फोट झाल्याने ती माहेरी वडिलांकडे राहत होती.

### ब्लॅकमेल करून महाविद्यालयीन तरुणीवर अत्याचार

अहिल्यानगर (स. गांवकरी) : संगमनेर ब्लॅकमेल करून महाविद्यालयातील तरुणीवर अत्याचार केला आणि खोटे मॅरेज सर्टिफिकेट तयार करून तिचे लग्नही मोडणाऱ्या तरुणाविरुद्ध मुलीच्या नातेवाइकांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मकरंद संजय गोडगे (रा. चिंचोली गुरव) असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी सांगितले, की एक तरुणी शहरातील एका महाविद्यालयात शिक्षण घेत होती. इन्स्टाग्रामवर तिची गोडगेशी ओळख झाली. त्याचा गैरफायदा घेत त्याने तरुणीसोबत फोटो काढले. ते व्हायरल करण्याची धमकी देत अत्याचार केला. दरम्यान, सदर मुलगी सुटत गावी गेली असता तेथेही त्याने त्रास दिला. सुटी संपल्यानंतर तरुणी पुन्हा शहरात आली. यावेळी त्याला समजून सांगण्याचा प्रयत्न करणाऱ्या तरुणीच्या मामालाही त्याने दमबाजी केली. पीडितेच्या नातेवाइकांनी हे सर्व प्रकार शहर पोलिसांना सांगितले. त्यानंतर आरोपी मकरंद संजय गोडगे याच्याविरुद्ध येथील शहर पोलिस ठाण्यात अत्याचारासह गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, पीडित तरुणीचे लग्न जमले होते. तेव्हा आरोपीने संबंधित वराच्या नातेवाइकांना सांगितले की, हिचे आणि माझे प्रेमसंबंध आहेत. आम्ही रजिस्टर लग्न केले आहे. मित्रांना फोनवर रजिस्टर लग्न झाल्याचे बनावट कागदपत्र टाकून आरोपीने पीडित मुलीचे लग्न मोडल्याचेही पोलिसांनी सांगितले.

### सावेडी उपनगरातील पार्लरवर छापा

अहिल्यानगर (स. गांवकरी) : सावेडी उपनगरातील सोनानगर चौक, बारस्कर मळा येथे अवैधरित्या सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर अहिल्यानगर शहर पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांच्या पथकाने धाड टाकून कारवाई केली आहे. एका पत्र्याच्या शेडमध्ये हा प्रकार सुरू होता. या कारवाईत पोलिसांनी हुक्का पिण्यासाठी वापरले जाणारे साहित्य आणि तंबाखूजन्य पदार्थ असा चार हजार २०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला असून दोन जणांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलीस अंमलदार हेमंत खंडागळे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. आदिराज विलास दोमल (रा. बालिकाश्रम रस्ता, अहिल्यानगर), मोहम्मद सत्तार अन्सारी (रा. रांची, झारखंड, सध्या रा. दिल्लीगेट, अहिल्यानगर) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सावेडी उपनगरातील सोनानगर चौक, बारस्कर मळा येथे आदिराज दोमल हा अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याची माहिती डॉ. टिपरसे यांना मिळाली होती. त्यांनी अंमलदार खंडागळे, महेश मगर, सागर व्दारके यांच्या पथकाला कारवाईचे आदेश दिले. पथकाने गेल्या बुधवारी (२२ एप्रिल) रोजी सायंकाळी सदर ठिकाणी छापा टाकून कारवाई केली. आदिराज दोमल हा या हुक्का पार्लरचा मालक असून, तो बेकायदेशीरपणे हे केंद्र चालवत होता. छाप्यात मोहम्मद अन्सारी हा तरूण हुक्का पिताना रंगेहाथ मिळून आला. पोलिसांनी घटनास्थळावरून काचेचे पॉट, चिलीम, हुक्का पाईप, चिमटा आणि विविध कंपन्यांचे तंबाखूजन्य फ्लेवर्स असा मुद्देमाल जप्त केला आहे.

### प्लॉट खरेदी-विक्री प्रकरणी सेवानिवृत्त व्यक्तीची पाच लाखांची फसवणूक

अहिल्यानगर (स. गांवकरी) : आळंदी (जि. पुणे) येथे प्लॉट देण्याचे आमिष दाखवून अहिल्यानगर शहरातील एका सेवानिवृत्त व्यक्तीला पाच लाख ५ हजार रूपयांना गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फसवणूक झालेले अर्जुन ग्यानुजी कांबळे (वय-६७, रा. यशोदानगर, पाईपलाईन रस्ता, सावेडी) यांनी यासंदर्भात गेल्या सोमवारी (२२ एप्रिल) फिर्याद दिली आहे. विनाश दिलीप घोजगे (रा. आंबी, तळेगाव दाभाडे, एमआयडीसी, जि. पुणे) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. फिर्यादी अर्जुन कांबळे यांच्या ओळखीचा अविनाश घोजगे हा प्लॉट खरेदी-विक्रीचा व्यवसाय करतो. कांबळे यांनी प्लॉट घेण्याची इच्छा व्यक्त केल्यावर घोजगे याने त्यांना आळंदी येथे एक प्लॉट दाखविला. तो प्लॉट पसंत पडल्यानंतर बुकिंगसाठी पाच लाख रूपये देण्याचे ठरले. कांबळे यांनी विश्वासाने वेळोवेळी बँक खाते आणि गुगलपेव्दारे एकूण पाच लाख पाच हजार रूपये घोजगे याच्या बँक खात्यावर वर्ग केले. पैसे मिळाल्यावर घोजगे याने ना प्लॉट दिला, ना घेतलेली रक्कम परत केली. वारंवार मागणी करूनही घोजगे टाळाटाळ करत असल्याने कांबळे यांनी पोलिसांत धाव घेतली व तक्रार अर्ज दिला. पोलिसांनी तक्रार अर्जाची चौकशी केल्यानंतर कांबळे यांची फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले.

# रविकांत राठोड यांना विधान परिषदेत संधी द्यावी

**टीशा माडेवार यांची ठाम मागणी!**

अकोले : (स. गांवकरी)





राज्यात येऊ घातलेल्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बंजारा समाजाला योग्य प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून रविकांत भाऊ राठोड यांना विधान परिषद सदस्य म्हणून संधी देण्यात यावी, अशी ठाम मागणी पक्षाच्या सरचिटणीस (भ.वि. विभाग, महाराष्ट्र प्रदेश) सौ. टीशा माडेवार यांनी केली आहे. या मागणीला भटके विमुक्त तालुका अध्यक्ष संजय फुलसुंदर यांचेही समर्थन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यासंदर्भात माहिती देताना माडेवार म्हणाल्या की, विधान परिषद निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली असून यावेळी सामाजिक समतोल राखणे अत्यंत आवश्यक आहे. बंजारा समाजाला योग्य प्रतिनिधित्व देणे ही काळाची गरज असून सक्षम व कार्यक्षम नेतृत्वाला संधी दिल्यास पक्ष अधिक मजबूत होईल, असे त्यांनी नमूद केले. रविकांत भाऊ राठोड हे तरुण, तडफदार आणि कणखर नेतृत्व म्हणून ओळखले जातात. मागील विधानसभा निवडणुकीदरम्यान त्यांनी विविध मतदारसंघांत प्रभावी प्रचार करत पक्षाच्या उमेदवारांना मोठा पाठिंबा मिळवून दिला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक ठिकाणी महायुतीचे उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून आल्याचा दावा करण्यात आला आहे.

नगर परिषद निवडणुकांमध्येही राठोड यांनी सक्रिय भूमिका बजावत पक्षसंघटन मजबूत करण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे. ग्रामीण तसेच शहरी भागात त्यांनी सातत्याने पक्षविस्ताराचे काम करत कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण केले आहे. म्हणूनच अशा दमदार व युवा नेतृत्वाला विधान परिषदेत संधी देणे आवश्यक असल्याचे माडेवार यांनी अधोरेखित केले. पक्षाने राठोड यांना उमेदवारी दिल्यास बंजारा समाज मोठ्या ताकदीने पक्षाच्या पाठीशी उभा राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, या मागणीमुळे बंजारा समाजात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून रविकांत राठोड यांच्या उमेदवारीला पाठिंबा वाढताना दिसत आहे. आगामी निवडणुकीत या मागणीला अधिक बळ मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी आहे.आता जून-जुलैमध्ये होणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना फॉर्म नंबर १७ भरावा लागणार आहे. हा फॉर्म भरल्यानंतर विद्यार्थ्यांना खाजगीरित्या परीक्षा देता येणार आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना खाजगीरित्या परीक्षा द्यायची आहे, त्यांनी फॉर्म भरायचे आहे. बोर्डाने याबाबत अपडेट दिली आहे. दहावी-बारावीच्या जून-जुलैमध्ये होणाऱ्या परीक्षेसाठी खासगी विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाइन पद्धतीने करण्यात येणार आहे. ऑनलाइन रजिस्ट्रेशन पूर्ण झाल्यानंतरच विद्यार्थ्यांना परीक्षेला बसता येणार आहे. नावनोंदणी करताना विद्यार्थ्यांच्या सध्याच्या पत्त्यातील जिल्हा, निवडलेले माध्यम, शाखेनुसार शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांची यादी दिसेल त्यातून एका शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाची निवड करावी लागेल. नोंदणी शुल्क ऑनलाइन पद्धतीने भरायची आहे. त्याबाबतची पावती विद्यार्थ्यांच्या त्याच्या लॉगिनमध्ये उपलब्ध होणार आहे. विद्यार्थ्यांना नावनोंदणीसाठी mahahsscboard.in या संकेस्थळाचा वापर करावा लागणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे ही नोंदणीप्रक्रिया केली जाणार आहे. याबाबत राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी परिपत्रकाद्वारे माहिती दिली आहे. शाळाबाह्य विद्यार्थी जे नोंदणी करु शकले नाही, अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, यासाठी ही संधी देण्यात आली होती. जून-जुलै २०२५ च्या परीक्षांसाठी खासगी विद्यार्थी म्हणून नोंदणी करु शकतात.

# "शब्दसंचित" ग्रंथाचे सतराव्या शब्दगंध साहित्य संमेलनात प्रकाशन

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या सतराव्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे, आजवर झालेल्या साहित्य संमेलनाध्यक्षांनी केलेल्या भाषणांचे "शब्दसंचित" या नावाने ग्रंथरूपाने प्रकाशन करण्यात येणार असल्याची माहिती कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे व खजिनदार भगवान राऊत यांनी दिली. शब्दगंध साहित्यिक परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र उदागे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. संस्थापक सचिव सुनील गोसावी यांनी संपादित केलेल्या या ग्रंथामध्ये राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनातील विविध अध्यक्षांच्या भाषणांचा समावेश करण्यात आला आहे. या "शब्दसंचित" ग्रंथात चित्रपट गीतकार व कविवर्य बाबासाहेब सौदागर, कथाकार नामदेवराव देसाई, प्राचार्य शिवाजीराव देवढे, काव्यनगरीकार डी. एम. कांबळे, ज्येष्ठ विचारवंत डॉ. कुमार सप्तर्षी, ज्येष्ठ लेखक डॉ. संजय कळमकर, कविवर्य प्रा. फ. मु. शिंदे, चित्रपट गीतकार कवी प्रकाश घोडके, लोककवी प्रशांत मोरे, माजी आमदार कविवर्य लहू कानडे, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. इंद्रजीत भालेराव, प्राचार्य डॉ. अशोकराव शिंदे, ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे, ज्येष्ठ पत्रकार ॲड. डॉ. बाळासाहेब बोठे, निवृत्त सनदी अधिकारी डॉ. पुरुषोत्तम भापकर व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. संजीवनी तडेगावकर यांच्या मनोगतांचा समावेश आहे. आजपर्यंतचे स्वागताध्यक्ष, उद्घाटक, उद्घाटन व समारोपाचे प्रमुख पाहुणे या सर्वांचा नामोल्लेख ग्रंथसूचीमध्ये करण्यात आला आहे.




मराठी साहित्याचे अभ्यासक, विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी "शब्दसंचित" हा ग्रंथ महत्त्वाचा दस्तऐवज ठरणार असून, सतराव्या संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात येणार आहे.

# 'भीमाशंकर' मध्ये स्वामी नलिनानंद गिरी महाराजांच्या पथकास विश्वस्त व पोलिसांनी रोखले

**अमेरिकेतील स्वामींचा दबाव; पोलिस यंत्रणेला : उद्धट भाषा वापरली**

मंचर : (स. गांवकरी)



जंगलवासी श्रीक्षेत्र भीमाशंकर मंदिर दुरुस्तीमुळे बंद असल्याची माहिती असतानाही अमेरिकेतून आलेल्या स्वामी नलिनानंद गिरी महाराजांनी दर्शनासाठी दबाव टाकत उद्धट भाषा वापरल्याचा प्रकार उघड झाला. मात्र पोलिसांनी नियमांनुसार त्यांना पुढे जाण्यास रोखले. स्वामी हे अमेरिकेतील 'इटर्नल व्हॉईस' संस्थेचे अध्यक्ष असून त्यांच्या सोबत सुमारे २० अमेरिकन, ३० भारतीय नागरिक १५ वाहनांतून आले होते.

सध्या मंदिरासमोरील सभामंडप व पायरी मार्गाच्या कामांमुळे तीन महिन्यांपासून प्रशासनाकडून मंदिर भाविकांसाठी बंद आहे. तरीही स्वामींनी मोठ्या आवाजात दबाव टाकत मंदिराकडे जाण्याचा प्रयत्न केला. पोलिस हवालदार सुरेश काटे यांनी नम्रपणे समजावून सांगत

नियमांची अंमलबजावणी केली आणि पथकाला पुढे जाण्यापासून रोखले. यावेळी स्वामी व त्यांच्या सहकाऱ्यांकडून "आमच्या मोठ्या ओळखी आहेत, परिणाम भोगावे लागतील," अशी भाषा वापरली तरी पोलिसांनी कर्तव्य बजावले.

देवस्थानचे उपकार्यकारी विश्वस्त मधुकर शास्त्री गवांदे म्हणाले, मंदिर बंद असल्याची माहिती देऊनही परवानगी न घेता येणे आणि प्रशासनावर टीका करणे चुकीचे आहे. स्वामींना कोणतीही अधिकृत परवानगी नव्हती. लेखी परवानगीशिवाय प्रवेश देता येणार नाही, असे पूर्वीच स्पष्ट करण्यात आले होते, असे अध्यक्ष सुरेश कौदरे म्हणाले. परवानगी नसताना येऊन दबाव टाकणे व भीमाशंकरची बदनामी करणे योग्य नाही. संबंधितांवर कारवाई व्हावी, अशी मागणी सरपंच दत्तात्रय हिले यांनी केली आहे. परदेशातून आले असले तरी नियमांचे पालन आवश्यक आहे. एवढ्या मोठ्या संख्येने येऊन गोंधळ घालणे योग्य नाही, असे उपकार्यकारी विश्वस्त मधुकर शास्त्री गवांदे यांनी स्पष्ट केले. गेले अनेक महिने प्रशासनाने भीमाशंकर मंदिर भाविकांना दर्शनासाठी बंद केले आहे असे सांगितले गेले आहे तरी देखील भाविक दर्शनासाठी येत आहेत त्यामुळे असे प्रकार मंदिर परिसरात घडत आहेत.

# धरण दुरुस्तीला गती; ३.०२ कोटींची निविदा प्रसिद्ध

जामखेड तालुका : (स. गांवकरी)



मुसळधार पावसामुळे नुकसान झालेल्या मोहरी लघु पाटबंधारे तलावाच्या दुरुस्तीच्या कामाला अखेर गती मिळाली असून धरण सुरक्षा पुनरावलोकन समितीच्या शिफारशीनुसार सुमारे ३ कोटी २ लाख ५२ हजार रुपयांची ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामुळे तालुक्याच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर शासनाने गंभीरपणे दखल घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

आमदार रोहित पवार व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर १३ एप्रिल रोजी धरण सुरक्षा पुनरावलोकन समितीने मोहरी तलावाची प्रत्यक्ष पाहणी केली होती. त्यानंतर समितीने आवश्यक दुरुस्ती व मजबुतीकरणाच्या कामांचा सविस्तर अहवाल कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे सादर केला. दरम्यान, आमदार पवार यांनी नुकत्याच कर्जत दौऱ्यात मुख्य अभियंता संजीव चोपडे यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून कामाला गती देण्याची मागणी केली होती. त्यानुसार २३ एप्रिल रोजी ही निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. ३० एप्रिलपर्यंत निविदा भरण्याची मुदत असून ४ मे रोजी ती उघडण्यात येणार आहे. त्यामुळे मे महिन्याच्या मध्यापर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. निवृत्त अधिकाऱ्यांच्या धरण सुरक्षा समितीने रणरणत्या उन्हात प्रत्यक्ष तलावात उतरून सुमारे दीड तास पाहणी केली होती. कोणतीही मदत न घेता क्षतिग्रस्त भागाचे मोजमाप करून तातडीने उपाययोजनांचा अहवाल सादर करण्यात आला. या समितीत जामखेड तालुक्याचे सुपुत्र, निवृत्त अधिक्षक अभियंता शिवाजी बोलभट यांचाही समावेश होता.

समितीच्या शिफारशीनुसार सैल झालेला खडक काढणे, सांडव्याची भिंत नव्याने बांधणे, मुख्य भरावाच्या बाजूची भिंत (फ्लँक वॉल) उभारणे, वाहून गेलेल्या चरात काँक्रीट काम करणे तसेच निचरा करणाऱ्या कालव्याचा (टेल चॅनल) तळ व बाजू मजबूत करणे अशी महत्त्वाची कामे हाती घेतली जाणार आहेत. हवामान विभागाच्या अंदाजानुसार यावर्षी मर्यादित पावसाची शक्यता असल्याने मोहरी तलावाचे महत्त्व अधिक वाढले आहे. हा तलाव एका पावसात भरून खर्ड्यासह सुमारे दहा गावांच्या पाणीपुरवठा योजना व शेती सिंचनासाठी जीवनदायी ठरतो. दुष्काळी परिस्थितीत टँकरद्वारे पाणीपुरवठ्यासाठीही हा तलाव प्रमुख स्रोत ठरला आहे. दरम्यान, ही कार्यवाही जलदगतीने होत असली तरी निविदा प्रक्रिया पारदर्शक राहावी, सक्षम ठेकेदाराची निवड व्हावी व कोणताही राजकीय हस्तक्षेप होऊ नये, अशी अपेक्षा विजयसिंह गोलेकर यांनी व्यक्त केली.

पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण होणे अत्यावश्यक असल्याने प्रशासनाने वेळेत व दर्जेदार काम करावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे. मोहरी तलावानंतर समितीने पाहणी केलेल्या नायगाव प्रकल्पाच्या दुरुस्तीची निविदा प्रक्रिया देखील लवकरच सुरू होण्याची शक्यता आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्वाचे

## शकुंतला विष्णू डोके यांचे निधन



शिवनेरी (स. गांवकरी) : कुमशेत गावातील सामाजिक , धार्मिक व परंपरा वारसा जपणाऱ्या ज्येष्ठ महिला गं.भा. कै. शकुंतला विष्णू डोके वय ९५ वर्ष यांचे निधन झाले आहे . यांच्या पाठीमागे ४ मुल , १ मुलगी , चुलते , सुना, जावई , नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. या डोके आजी ने गावांतील अखंड हरिनाम सप्ताह , काकड आरती, महाशिवरात्र व इतर धार्मिक कार्यात वारकऱ्यांची सेवा दरवर्षी केलेली आहे.

## मंथन सामान्य ज्ञान परीक्षेत गोमळवाडीच्या श्रेया कर्जुलेची उत्तुंग भरारी





शिवनेरी (स. गांवकरी) : मंथन वेलफेअर फाउंडेशन द्वारा आयोजित राज्यस्तरीय मंथन सामान्य ज्ञान परीक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोमळवाडी. ता . नेवासा येथील इयत्ता दुसरीत शिकणाऱ्या श्रेया योगेश कर्जुले हिने महाराष्ट्र राज्यात गुणवत्ता यादीत चौथा क्रमांक मिळविला आहे . श्रेया कर्जुले हिने 150 पैकी 144 गुण मिळवून उत्तुंग यश संपादन केले आहे . तिच्या या यशाबद्दल तिच्या कुटुंबीयांसोबत गाव,शाळा व परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे . ग्रामीण भागात जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणारी श्रेया कर्जुले हिची जिद्द चिकाटी आणि अभ्यासातील सातत्य यामुळेच तिला हे यश मिळालेले आहे . महाराष्ट्राच्या गुणवत्ता यादीत तिचे नाव झळकल्यामुळे शाळेला व गावाला तिचा अभिमान वाटतो . तिच्या या यशामध्ये तिला मार्गदर्शन करणारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोमळवाडी चे मुख्याध्यापक - श्री ठुबे सर, वर्ग शिक्षिका श्रीमती सुरेखा रणदिवे मॅडम तसेच तिला अभ्यासात मदत करणारे तिचे पालक या सर्वांचे शाळा व्यवस्थापन समिती गोमळवाडी यांनी अभिनंदन केले आहे . तिच्या या यशामुळे सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रेरणा मिळणार आहे . श्रेया कर्जुले हिला पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.



## ब्राम्हणवाडा गावात गॅस टंचाई; दोन-दोन महिने प्रतीक्षेनंतरही टाकी मिळत नाही!

- सुभाष गायकर यांचा पुढाकार
- खासदार ज्योती वाघमारे यांच्याकडून ब्राम्हणवाडा गॅस टंचाईवर लवकर तोडग्याचे आश्वासन!

ब्राम्हणवाडा (स. गांवकरी) : अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा गावात गेल्या मार्च महिन्यापासून तीव्र गॅस टंचाई निर्माण झाली असून ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दोन-दोन महिने गॅस बुकिंग करूनही वेळेवर टाकी मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर ब्राम्हणवाडा गावचे उपसरपंच सुभाष गायकर यांनी खासदार ज्योती वाघमारे यांची भेट घेऊन गावातील गॅस टंचाईची गंभीर समस्या त्यांच्या निदर्शनास आणून दिली. यावेळी संगमनेरचे आमदार अमोल खताळ तसेच माजी खासदार सदाशिव लोखंडे उपस्थित होते. उपसरपंच सुभाष गायकर यांनी सांगितले की, वारंवार तक्रारी करूनही गॅस पुरवठा सुरळीत होत नाही. संबंधित पुरवठा अधिकाऱ्यांनाही याबाबत कळवण्यात आले आहे, मात्र अद्याप कोणताही ठोस उपाययोजना झालेली नाही. त्यामुळे ग्रामस्थांना रोजच्या स्वयंपाकासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. यावर प्रतिक्रिया देताना खासदार ज्योती वाघमारे यांनी लवकरच संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून गॅस पुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना केली जाईल, असे आश्वासन दिले. गावातील नागरिकांनी प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित तोडगा काढावा, अशी मागणी केली आहे.

## देगलूर महावितरणच्या नवीन विभागीय कार्यालयासाठी 1.26 कोटींचा निधी मंजूर

देगलूर (स. गांवकरी) : देगलूर महावितरण विभागाच्या विकासाला गती देणारा निर्णय अखेर साकार झाला असून महावितरणच्या नवीन विभागीय कार्यालयाच्या स्वतंत्र इमारतीसाठी तब्बल 1 कोटी 26 लाख 78 हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे देगलूरसह परिसरातील वीज व्यवस्थापन अधिक सक्षम व कार्यक्षम होणार असल्याचे चित्र आहे. देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघाचे आ. जितेश अंतापूरकर यांनी या संदर्भात सातत्याने पाठपुरावा करत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश आले असून मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रस्तावाची तात्काळ दखल घेत निधी मंजूर केला आहे. नवीन विभागीय कार्यालयाच्या इमारतीमुळे महावितरणच्या कामकाजाला स्वतंत्र व सुसज्ज सुविधा मिळणार आहेत. यामुळे नागरिकांना वीजसंबंधित सेवा अधिक जलद आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध होणार आहेत. तसेच, प्रशासनिक कार्यक्षमता वाढून तक्रार निवारण प्रक्रियेलाही गती मिळणार आहे. दरम्यान, मंजूर निधीच्या प्रक्रियेला लवकरच अंतिम स्वरूप दिले जाणार असून प्रत्यक्ष बांधकाम कामालाही लवकरच सुरुवात होणार असल्याची माहिती मिळाली आहे. या निर्णयामुळे देगलूरच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळणार असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

## वाटणी पत्राच्या नोंदणीसाठी शुल्कातून पूर्णपणे सूट

मुखेड (स. गांवकरी) : शेत जमिनीच्या वाटणी पत्रावर आकारले जाणारे नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला आहे. याबाबतचे परिपत्रक महसूल विभागाने जारी केले असून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ८५ अंतर्गत येणाऱ्या प्रकरणासह आपसातील समतीने थेट दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीसाठी येणाऱ्या वडिलोपार्जित शेत जमिनीच्या वाटणी पत्रांनाही नोंदणी शुल्कातून पूर्णपणे माफी देण्यात आली आहे शासनाने २३ जून २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार कलम ८५ अन्वये एकाच कुटुंबातील सदस्यांनी केलेल्या शेत जमिनीच्या वाटणी पत्रावर कोणतेही नोंदणी शुल्क आकारले जाणार नाही अशी तरतूद करण्यात आली होती. या कलम अंतर्गत वाटणी पत्राचे अधिकार तहसीलदारांना आहेत. परंतु अनेक नागरिक तहसीलदाराकडे न जाता थेट दुय्यम निबंध कार्यालयात आपसातील समतीने वाटणी पत्र नोंदणीसाठी सादर करीत होते. अशा वेळी मूळ अधिसूचनेत स्पष्ट तरतूद नसल्याचे कारण देत दुय्यम निबंधक कार्याकडून नोंदणी शिल्लक आकारले जात होते.

# सौ. वनिता मानकर यांचे महिला सबलीकरणाचे उत्कृष्ट कार्य

**विक्रम पाठक**

अहिल्यानगर: (स. गांवकरी)



श्री जिव्हेश्वर महिला मंडळाचे अध्यक्षा सौ.वनिता मानकर यांनी जिव्हेश्वर महिला मंडळाच्या माध्यमातून महिलांनासाठी एक व्यासपीठ निर्माण केले आहे. महिलांना बचत गटाच्या माध्यमातून व्यवसाय करण्यासाठी सातत्याने प्रेरणा देण्याचे काम ते करीत आहे. महिला सबलीकरणासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन रायगड येथील छत्रपती कर्तुत्वभूषण पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले आहे.ही साळी समाजासाठी अभिमानास्पद बाब आहे.सौ. वनिता मानकर यांचे महिला सबलीकरणाचे केलेले कार्य उत्कृष्ट आहे.असे प्रतिपादन स्वकुळसाळी हित संवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक यांनी केले आहे.

श्री जिव्हेश्वर महिला मंडळाचे अध्यक्षा सौ.वनिता गणेश मानकर यांना नुकतेच "श्री छत्रपती कर्तृत्व भूषण पुरस्कार" ने सन्मानित करण्यात आले.याबद्दल त्यांच्या विविध सामाजिक संस्थांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळ,श्री जिव्हेश्वर मित्र मंडळ दिल्लीगेट,श्री लक्ष्मीनारायण नागरी पतसंस्था,आर्ट ऑफ लिविंग,वेस्ट पेपर मर्चंट असोसिएशन,श्री जिव्हेश्वर महिला मंडळ यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक,सेक्रेटरी विजय मानकर,खजिनदार गजेंद्र सोनवणे, योगेश पाढरपोटे,श्री जिव्हेश्वर मित्र मंडळ दिल्ली गेट चे अध्यक्ष संजय सागांवकर,विनायक नाटाळे,मोहन ठाणेकर,उल्हास ढोरे,संजय दळवी,योगेश भागवत,लक्ष्मीनारायण नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष सौ.मिनलताई बोरा,उपाध्यक्ष सौ.स्वाती गुंदेचा,कार्यकारी संचालक नरेंद्र बागडे,गणेश मानकर, अँड.अभिजीत कोठारी,निकिता कनोरे, व्यवस्थापक संतोष वल्ली, आरती ढोरे, अमृता कांबळे, आर्ट ऑफ लिविंग चे जिल्हा समन्वय प्रकाश लोखंडे, योगाटीचर नरेंद्र बोठे,सुभाष लोणावत,माधुरी लोणावत, दत्तात्रय आंधळे,नूतन आंधळे, अंबादास वल्लाकट्टी, इंजिनीयर असोसिएशनचे ईश्वर बोरा, कुणाल बुरगुल,वेस्ट पेपर मर्चंट चे राजेश बजाज, अजित सेठ बोरा,संजय कोठारी, रणरागिणी महिला फाउंडेशनच्या सौ.रोहिणीताई पवार,सौ.ज्योती ताई पवार,सौ. विजयालक्ष्मी लयचेट्टी,जिव्हेश्वर महिला मंडळाच्या सौ.शैलाताई मानकर, छायाताई साळी, शुभदा वल्ली,विशाखा मानकर,अनिता मानकर, सुनिता मानकर,स्नेहा पाठक,चेतना मानकर,शितल सागांवकर,विद्या सवई, अलकाताई नाटाळे, मिराबाई ठाणेकर,अंजली खिदारे आदींसह विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

लक्ष्मीनारायण पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ.मीनल बोरो म्हणाल्या,सौ.वनिता मानकर या रांगोळी व मेहंदी आर्टिस्ट असून त्यांनी आत्तापर्यंत १०० मुलींना शिक्षण देऊन त्यातून रोजगार उपलब्ध करून दिला आहे. प्रामाणिकपणे,निष्ठेने व सातत्यपूर्ण परिश्रमांद्वारे उल्लेखनीय कार्य केले असून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेले योगदान अत्यंत प्रेरणादायी व मोलाचे आहे.

सत्काराला उत्तर देताना सौ.वनिता मानकर म्हणाल्या,मी या सत्काराने भारावून गेले आहे.विविध सामाजिक संस्था व समाजाच्या पाठिंब्यामुळे मला समाज कार्य करण्यासाठी एक नवीन ऊर्जा मिळाली आहे.श्री.जिव्हेश्वर महिला मंडळाच्या माध्यमातून या पुढील काळातही अनेक उपक्रम महिलांसाठी राबविण्यात येणार आहे.तसेच महिलांना उद्योजकता प्रशिक्षण मिळावे यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छाया साळी यांनी केले तर आभार नरेंद्र बोठे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी शहरातील विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व साळी समाज बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## बीएसएनएलची सेवा सुरळीत करा अन्यथा आंदोलन

पाथर्डी : (स. गांवकरी)

माणिकदौंडी परिसरामध्ये बीएसएनएल या सरकारी मोबाईल कंपनीची रेंज सेवा मिळत नसल्याने टॉवर व मशिनरी दुरुस्ती करून रेंज सेवा नियमित व सुरळीत करा, अशी बीएसएनएल चे उपमंडल अभियंता यांच्याकडे मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आजच्या काळात संपर्कासाठी मोबाईल पेक्षा जलद कोणतीही गोष्ट नाही. माणिकदौंडी भागात बीएसएनएलचे टॉवर आहेत. परंतु रेंज नियमित मिळत नाही, अशी परिस्थिती आहे. माणिकदौंडी, पिरेवाडी, जगसोंड तांडा, आल्हणवाडी, बोरसेवाडी, घुमटवाडी, चितळवाडी, पत्र्याचा तांडा, धनगरवाडी या ठिकाणी टॉवर असून देखील रेंज नियमित मिळत नसल्याने या भागातील नागरिकांना परवडणाऱ्या सरकारी कंपनीच्या सेवेपासून वंचित राहून महागड्या इतर कंपन्यांची सेवा नाईलाजाने घ्यावी लागते. बीएसएनएलची कृषी कार्ड १४१ रुपये तर साधारण रिचार्ज १४७ रुपयात महिनाभर सेवा मिळते.

## भिंगार येथे २५ एप्रिल रोजी विराट हिंदू संमेलनाचे आयोजन

### प्रखर हिंदुत्ववादी वक्ते बजरंग दलाचे अखिल भारतीय सहसंयोजक विवेक कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

शनिवार दि. २५ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता श्री शुक्लेश्वर महादेव मंदिर, नागरदेवळे,भिंगार येथे विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. विराट हिंदू संमेलनाचे प्रखर हिंदुत्ववादी वक्ते बजरंग दलाचे अखिल भारतीय सहसंयोजक विवेक कुलकर्णी,मेहेकरी येथील संजीवनी गडाचे महंत शंकर भारती जी गुरू खुशाल भारती,युवा प्रवचनकार हभप महादेव महाराज घोडके (आळंदी पुणे), हिंदुत्ववादी कार्यकर्ते सर्वेश मेहंदळे (पुणे) आदींच्या प्रमुख उपस्थितीत विराट हिंदू संमेलन होणार आहे.

विराट हिंदू संमेलनाच्या माध्यमातून हिंदू समाजाला एकत्र आणण्याचा आणि संघटित हिंदू-समर्थ भारत हा संदेश जनतेपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला आहे." हिंदू सारा एक मंत्र हा,दाही दिशांना घुमवू या " या घोषवाक्याखाली आयोजित करण्यात आलेल्या या संमेलनामुळे अहिल्यानगर शहर परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. हिंदू समाजातील विविध घटकांमध्ये ऐक्य निर्माण करणे हा या संमेलनाचा मुख्य उद्देश आहे. जात,पंथ, भाषा,प्रांत यांचे भेद विसरून एकत्र येऊ या.कोहिनूर व परशुराम वस्ती यांच्या विराट हिंदू संमेलन समितीच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येत असून,नागरिकांनी सहकुटुंब सक्रिय सहभाग नोंदवावा. हिंदू धर्म, परंपरा, संस्कृती आणि मूल्यांचे जतन व संवर्धन करण्याचा संदेश या व्यासपीठावरून दिला जाणार आहे.बदलत्या सामाजिक परिस्थितीत संस्कृतीचे रक्षण आणि भावी पिढ्यांपर्यंत तिचा वारसा पोहोचवणे आवश्यक असल्याचे संमेलनाच्या आयोजकांनी सांगितले. संमेलनाच्या माध्यमातून युवकांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव आणि देशभक्तीची भावना दृढ करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन राष्ट्रनिर्मितीत सक्रिय भूमिका बजावावी,यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे.या विराट हिंदू संमेलनासाठी हिंदू समाजाने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.कार्यक्रमाचा शेवटी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

## चांदीमध्ये अपहार नसून कालांतराने झालेली घट

कळवण : (स. गांवकरी)



लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री सप्तशृंगी गडावरील भगवती मंदिराच्या नक्षीकामात चांदीमध्ये तफावत आढळून आली असून अपहार झाल्याचा आरोप दिशाभूल करणार आहे .चांदीमध्ये कुठलाही अपहार झाला नसून कालांतराने चांदीमध्ये झालेली घट आहे. त्या संदर्भातील अभिप्राय व अहवाल प्राप्त असल्याची माहिती श्री सप्तशृंगी निवासनी देवी ट्रस्टचे विश्वस्त मंडळ प्रतिनिधी यांनी दिली.

सन १९९८ पासून भाविकांनी अर्पण केलेल्या चांदी पैकी ३९७ किलो चांदीचा वापर भगवती मंदिराच्या गर्भगृहातील नक्षीकामासाठी करण्यात आला होता. मात्र, २०२१-२२ मध्ये श्री भगवती मूर्तीच्या संवर्धनाचे काम हाती घेण्यात आले, तेव्हा आयआयटी पवईच्या मार्गदर्शनानुसार हे चांदीचे नक्षीकाम काढण्याचे नियोजन होते. ही संपूर्ण प्रक्रिया मा. अध्यक्ष व विश्वस्त मंडळ यांच्या संयुक्तिक सभेत ठरले प्रमाणे दि. १५ सप्टेंबर २०२१ व २ ऑगस्ट २०२२ रोजी तत्कालीन विश्वस्त मंडळाचे अन्य प्रतिनिधी, विश्वस्त संस्थेच्या विविध विभागांचे प्रमुख आणि मे. पी.एन. गाडगीळ या संस्थेच्या प्रतिनिधीच्या प्रत्यक्ष उपस्थितीत पार पडली. तदनंतर श्री भगवती मंदिरातून काढून आणलेल्या चांदीचे विश्वस्त मंडळ प्रतिनिधी, विश्वस्त संस्थेचे मूल्यमापक, पी एन गाडगीळ यांचे प्रतिनिधी तसेच विश्वस्त संस्थेचे अधिकारी व कर्मचारी वर्ग यांचे उपस्थितीत धर्म काट्यावर मोजदाद करण्यात आली असता त्याचे वजन ३८४ किलो प्राप्त झाले असता त्यातील फरक १३ किलो चांदी बाबत अभिप्राय नोंदविण्यात आला असता, गेल्या २० ते २२ वर्षांपासून दैनंदिन पूजेत वापरल्या जाणाऱ्या कुंकवातील आम्लयुक्त घटकांमुळे चांदीची झीज होणे नैसर्गिक असल्याचे तज्ज्ञांनी स्पष्ट केले असून नारळाचे आणि तारेचे घासणीने अनेक वर्ष गाभारा चांदी घासण्याची पद्धत होती. त्यामुळे वजनात होणारी घट ही तांत्रिक असून त्यामागे कोणताही अपहार नाही. सध्या सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाची हिशोब प्रक्रिया आणि चांदीची अंतिम हिशोब प्रक्रिया सुरू असून त्याचा अधिकृत अहवाल अद्याप प्राप्त नसून प्रलंबित आहे. ही सर्व प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पद्धतीने नियमानुसार सुरू असताना, निलंबित व्यवस्थापक श्री सुदर्शन दहातोंडे हे जाणून-बुजून चांदी बाबत गैरसमज / दिशाभूल करुन भाविकांच्या मनात संभ्रम निर्माण करीत आहेत. अशी माहिती ट्रस्टचे विश्वस्त मंडळ प्रतिनिधी ॲड. श्री. ललित रविंद्र निकम श्री सप्तश्रृंगी निवासनी देवी ट्रस्टच्या वतीने सर्व भाविकांना विनम्र आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये. वस्तुस्थितीची शहानिशा करण्यासाठी ट्रस्ट कार्यालयाशी संपर्क साधावा ज्यामुळे भाविकांच्या श्रद्धेला तडा जाणार नाही. चांदी संदर्भातील अंतिम हिशोब प्रक्रिया पूर्ण झाल्यावर अधिकृत आकडेवारी जाहीर केली जाईल, अशी माहिती ट्रस्टचे विश्वस्त मंडळ प्रतिनिधी ॲड. श्री. ललित रविंद्र निकम, सौ. मनज्योत युवराज पाटील, डॉ. श्री. प्रशांत सुखदेव देवरे व श्री. भूषणराज शशीकुमार तळेकर यांनी वृत्त माध्यमांना दिली.

## केळी भाव वाढल्याने शेतकरीराजा सुकवला!



रावेर : (स. गांवकरी)

जळगाव जिल्हा हा केळीचा जिल्हा म्हणुन राज्यासह देशात ओळखला जातो . परंतू युद्धजन्य परिस्थितिमुळे गेल्या काही महिन्यांपासून केळी भावात घसरण सुरूच होती . याचाच परिणाम म्हणुन ४०० ते ५०० रुपये प्रतिक्विंटल प्रमाणे मागणी होऊन , भावात घरण झाली होती . त्यामुळे शेतकऱ्यांचे स्वप्न भंग होऊन , गेल्या दोन वर्षा पासून भावात अशीच घसरती परिस्थिती होती . परंतु आता २४ एप्रील २० २ ६ रोजी चांगल्या प्रतिच्या केळीचे भाव दोन हजाराच्या वर गेल्याने शेतकरी राजा सुकावला आहे. भविष्यात असेच भाव राहीले तर शेतकर्यांच्या घामाला दाम मिळाल्या सारखे होईल असे जरी बोलले जात असले तरी हे येणारी वेळच ठरवेल यात मात्र शंकाच नाही.

अनेक स्वप्ने उराशी बाळगुन असलेला आमचा बळीराजा पुर्ण क्षमतेने स्वताहाच्य पायावर उभा राहील . माहागडी रासायनिक खते , मजुर खर्च , पाहाता केळीला असेच भाव राहीले पाहिजे अशी अपेक्षा असतांना मात्र व्यापाऱ्यांच्या संगन मताने त्यावर नेहमीच अन्याय झालेला आहे . असे जरी असले तरी वाढत्या भावाने शेतकरी राजा सुकावला असल्याचे दिसत आहे.

# आदर्श प्राथमिक शाळा वडगाव आनंद शाळेत अधिकाऱ्यांची भेट

वडगाव आनंद : (स. गांवकरी)




प्राथमिक शाळा वडगाव आनंद या शाळेला नुकतीच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी भेट दिली. भेटीदरम्यान शाळेमध्ये चालू असणाऱ्या परसबाग, वातानुकूलित अद्यावत २६ संगणक असणारे संगणक कक्ष, शिष्यवृत्ती तसेच मियावाकी पद्धतीने नैसर्गिक जंगल उपक्रम, अल्कलाईन वॉटर फिल्टर, सीसीटीव्ही सुविधा, दप्तराविना शाळा उपक्रम अशा विविध उपक्रमांची माहिती घेऊन शाळेचे भरभरून कौतुक केले. भेटीदरम्यान शाळेच्या विद्यार्थ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी महोदयांनी संगणकावर विविध प्रात्यक्षिके करून दाखवली. साहेबांनी इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वर आधारित प्रश्न विचारले असता, विद्यार्थ्यांनी अचूक उत्तरे दिली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समाधान व्यक्त केले. भेटीदरम्यान शाळेचे शिक्षण तज्ञ तथा शिक्षण प्रेमी डी.बी.नाना वाळुंज व शालेय समिती अध्यक्ष दत्तात्रय चौगुले पाटील यांनी शाळेच्या विकासात भर घालण्यासाठी जलतरण तलावासाठी रक्कम रुपये वीस लक्ष रुपयांची मागणी केली तसेच इयत्ता पाचवीच्या वर्गवाढीची मागणी केली असता दोन्ही बाबींचा सकारात्मक विचार केला जाईल असे सुतोवाच मुख्य कार्यकारी अधिकारी साहेबांनी केले. त्याचप्रमाणे विशेष मागणी दरम्यान शाळा सीबीएससी अंतर्गत इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत मान्यता मिळण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद देत व्यवस्थापन समितीने मोठ्या प्रमाणात वर्गखोल्या सी एस आर निधीमधून उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याचे बोलून दाखवले त्या अनुषंगाने सीएसआर निधी देणाऱ्या कंपन्यांसमवेत प्रत्यक्ष किंवा vc द्वारे चर्चा करून पुढील सकारात्मक निर्णय देण्याबाबत त्यांनी संमती दर्शवली.

या भेटीदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील साहेब जुन्नर तालुका गटविकास अधिकारी प्रतीक चन्नावार, कार्यकारी अभियंता बांधकाम (शिक्षण) जितेंद्र मेमाणे मॉडेल स्कूल समन्वयक सिद्धार्थ चव्हाण, जुन्नर तालुका गटशिक्षण अधिकारी अशोक लांडे, विस्तार अधिकारी शिक्षण विष्णू धोंडगे, केंद्रप्रमुख पुष्पा हांडे, उप अभियंता बांधकाम महेश परदेशी,कनिष्ठ अभियंता आर जी होडगे, वडगाव आनंदच्या लोक नियुक्त सरपंच रेलीका जाधव उपसरपंच गणेश भुजबळ सदस्या वंदना शिंदे, शोभा शिंदे, अश्विनी चौगुले, अल्पना देवकर, निशा वाळुंज, वैशाली देवकर, ग्रामपंचायत सदस्य गोरक्ष देवकर, संतोष पादिर, ऋषी गडगे, संदीप गडगे, सोमनाथ गडगे, त्याचप्रमाणे माझी तलाठी रोहिदास वामन, सामाजिक कार्यकर्ते अरुण जाधव, गणेश वाघमारे, नवनाथ वाळुंज, संदेश काशीकेदार, दिलीप चौगुले, सचिन देवकर, रामा चौगुले, बोरी गावचे सामाजिक कार्यकर्ते अमोल भाऊ कोरडे,आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भेट दौरा यशस्वी होण्यासाठी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष दत्तात्रय चौगुले पाटील, शिक्षण तज्ञ तथा सामाजिक कार्यकर्ते डी बी नाना वाळुंज, ग्रामविकास अधिकारी ज्ञानेश्वर मुकणे, शाळेचे मुख्याध्यापक सुनील ठिकेकर, शिक्षक छाया डुंबरे, सुनंदा तांबे, गीतांजली बोऱ्हाडे, सविता खेत्री यांनी नियोजन केले.

# थोडक्यात पण महत्वाचे




## बसवेश्वर महाराज जयंती उत्साहात साजरी; बस स्थानकावर भव्य सोहळा

वसमत (स. गांवकरी) : वसमत येथील बस स्थानक परिसरात जगद्गुरु बसवेश्वर महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांमुळे परिसरात दिवसभर धार्मिक व सामाजिक वातावरण निर्माण झाले होते. विशेष म्हणजे, अन्नदानाचा भव्य कार्यक्रम हा या उत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरला. कार्यक्रमाची सुरुवात श्री दिगंबर शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते बसवेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बसवेश्वर महाराजांनी दिलेल्या समता, सत्य, अहिंसा व श्रमसंस्काराच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन या विचारांची अंमलबजावणी केल्यास समाज अधिक सक्षम व सुसंस्कृत होईल, असे त्यांनी सांगितले. जयंतीनिमित्त बस स्थानक परिसर आकर्षक सजावटीने सजविण्यात आला होता. फलक, बॅनर व घोषवाक्यांद्वारे बसवेश्वर महाराजांचे विचार जनमानसात पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. दिवसभर विविध समाज बांधवांनी उपस्थित राहून अभिवादन केले. यानंतर अन्नदानाचा भव्य कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात शेकडो नव्हे तर हजारो भाविकांनी सहभाग नोंदवून प्रसादाचा लाभ घेतला. महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक, प्रवासी तसेच सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लावली. अन्नदानाची व्यवस्था अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आल्यामुळे कोणतीही गैरसोय झाली नाही. या प्रसंगी नगरसेवक, विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, समाज बांधव तसेच एस.टी. आगारातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. एकूणच, बस स्थानक परिसरात साजरी करण्यात आलेली बसवेश्वर महाराज जयंती ही केवळ धार्मिक कार्यक्रम न राहता सामाजिक एकात्मतेचा संदेश देणारा प्रेरणादायी सोहळा ठरला.

## महाराजस्व अभियान समाधान शिबीर.. टाय टाय फिश

तामसा (स. गांवकरी) : छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबीर अभियान टप्पा 1 टाय टाय फिश.. तेसिल कार्यालय हदगाव द्वारे आयोजित अधिकृत अभियान च्या अनुषंगाने हदगाव तहसीलदार यांनी ठेवलेल्या हदगाव तालुक्यातील महाराजस्व अभियानांतर्गत सर्वसामान्य महसूल विभागाच्या सेवा नागरिकांच्या दारी पोहोचवून प्रशासन अधिक गतिमान करणे, नागरिकांचा दैनदिन महसूल विषयक तक्रारीचे एकाच ठिकाणी तात्काळ निवारण करणे, डिजिटल सेवांचा वापर या अनुषंगाने ठेवण्यात आलेल्या हा महाराजस्व अभियान महसूल कर्मचाऱ्यांच्या संपामुळे फिशपॉन्ड झाल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केल्या जात आहे. हदगांव तालुक्यातील महाराजस्व अभियान अंतर्गत शिवीराचे मंडळानिहाय आयोजित केलं होतं त्याच्यात मनाठा येथील शिवीर आज दिनांक 24 ला नियोजित असून संप मुळे स्थगित करण्यात आलं. या स्थगितीमुळे जनतेत महसूल प्रशासन बद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत आहे.. तामसा येथे नियोजित महाराजस्व अभियान दिनांक 30 रोजी ठरवलं असून या संदर्भात संबंधित तलाठी तामसा सज्जा यांना भ्रमणध्वनी द्वारे विचारपूस केल्यास त्यांनी संबंधित महसूल चा संप बेमुदत असून नियोजित तामसा येथील महाराजस्व शिवीर बद्दल सांगता येत नाही असं माहिती दिली.

## तापमानात वाढ; कडक उन्हामुळे दुपारची वर्दळ कमी

वसमत (स. गांवकरी) : शहरासह परिसरात उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस तीव्र होत असून, एप्रिल महिन्याच्या मध्यावरच तापमानाने उच्चांक गाठण्यास सुरुवात केली आहे. सकाळपासूनच उन्हाची तीव्रता जाणवू लागते, तर दुपारच्या सुमारास उष्णतेचा कडाका अधिक वाढत आहे. परिणामी, दुपारच्या वेळेत शहरातील बाजारपेठा, मुख्य रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी नेहमीची वर्दळ लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत नागरिक शक्यतो घराबाहेर पडणे टाळत असून, अत्यावश्यक कामे सकाळी लवकर किंवा सायंकाळी उशिरा पूर्ण करण्याकडे कल वाढला आहे. त्यामुळे दुपारच्या वेळी शहरातील प्रमुख चौक, व्यापारी संकुले आणि रस्ते तुलनेने ओस पडलेले दिसत आहेत. काही भागांत तर दुपारी अगदी विरळच वाहतूक आणि हालचाल सुरू असल्याचे चित्र आहे. उष्णतेचा फटका व्यापारी व व्यावसायिकांनाही बसत असून, दुपारच्या सुमारास ग्राहकांची संख्या मोठ्या प्रमाणात घटल्याची माहिती स्थानिक व्यापाऱ्यांनी दिली. त्यामुळे काही दुकानदारांनी दुपारच्या वेळेत दुकाने अर्धवेळ बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. फेरीवाले आणि रस्त्यावरचे विक्रेतेही उन्हाच्या तीव्रतेमुळे कमी प्रमाणात दिसत आहेत.

## प्रशिक्षणास गैरहजर शिक्षकांना कारणे दाखवा नोटीस

वसमत (स. गांवकरी) : नगरपरिषदेच्या हद्दीत होणाऱ्या जनगणना 2027 च्या कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रगणक व पर्यवेक्षकांवर प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. जनगणना प्रशिक्षणास गैरहजर राहिलेल्या संबंधित शिक्षकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, तीन दिवसांत लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नगरपरिषदेकडून मिळालेल्या माहितीनुसार, भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार व जनगणना अधिनियम 1948 तसेच जनगणना नियम 1990 अंतर्गत हे काम राबवले जात आहे. आरटीई अधिनियम 2009 च्या कलम 27 नुसार शिक्षकांना जनगणना कार्यासाठी नियुक्ती करण्याचा अधिकार प्रशासनाला आहे. याच पार्श्वभूमीवर, वसमत शहरातील शहरी भागासाठी दि. 23 ते 25 एप्रिल 2026 दरम्यान जनगणना प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, काही नियुक्त कर्मचारी/शिक्षक प्रशिक्षणास अनुपस्थित राहिल्याचे निदर्शनास आले. यामध्ये योगानंद सरस्वती प्रायमरी स्कूलचे चापके हरीभाऊ रामराव,चव्हाण गजानन विश्वनाथ महात्मा गांधी विद्यालय, ज्ञानबा बळीराम वाकडे कालवा निरीक्षक पूर्णा पाठवंधारे विभाग, हंबर्डे सुरेश तुळशीराम सहाय्यक शिक्षक, कांबळे गौतम विठ्ठल श्री योगानंद स्वामी कला कॉलेज, लवेकर गजानन श्रीरामराव सहाय्यक शिक्षक, मोहम्मद शब्बीर मोहम्मद बशीर सहाय्यक शिक्षक ,एम डी मुजाहेद एम डी उस्मान सहाय्यक शिक्षक , म अतिख म युसूफ सहाय्यक शिक्षक, नारायण उद्धव गरगे सहाय्यक शिक्षक, पडोळे चंद्रशेखर विलासराव सहाय्यक शिक्षक ,पोटजे गोविंद विठ्ठलराव सहाय्यक शिक्षक, रुस्तुम बाबाराव काळे योगानंद सरस्वती शाळा, शिंदे संजय नारायण सहाय्यक शिक्षक , साळवे प्रकाश साहेबराव सहाय्यक शिक्षक यांचाही समावेश असल्याचे समोर आले आहे.

# आमदार दातेंच्या नेतृत्वाखाली आढावा बैठक संपन्न

पारनेर : (स. गांवकरी)




शुक्रवार दि. २४ एप्रिल २०२६ पारनेर शहरातील जिल्हा बँकेच्या सभागृहात पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची महत्त्वपूर्ण आढावा बैठक संपन्न झाली. आगामी राजकीय व संघटनात्मक वाटचालीस दिशा देणारी ही बैठक ठरली असून, मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती यावेळी पाहायला मिळाली.

या बैठकीस जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, ज्येष्ठ नेते प्रभाकर शेठ कवाद, मतदारसंघ अध्यक्ष विजुभाऊ औटी, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, जिल्हा कार्याध्यक्ष सुधामती कवाद, तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, जिल्हा उपाध्यक्ष सोनाबाई चौधरी, युवा तालुकाध्यक्ष भास्कर उचाळे, महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, डी. आर. शेंडगे, युवती तालुकाध्यक्ष अपर्णा खामकर, उपाध्यक्ष रेश्मा गलांडे, आर. एस. कापसे, डॉ. प्रदीप दाते, मंगेश शेठ दाते, हरिष काका दावभट, राजेंद्र औटी, अनिल देठे, गोकुळ मामा काकडे, साहेबराव वाफारे, प्रदीप वाळुंज, देवराम मगर, अंजुम पठाण, सोनाली कुलथे, निलम गोसावी, अनिल मदगे, रामदास ढोले, संतोष सालके, पिनु रोहोकले, सुभाष सासवडे, संतोष मोरे, बाळासाहेब सोबले, बाबासाहेब दाते, बाळासाहेब रोकडे, सुभाष ठाणगे, राहुल तामखडे, जयसिंग कर्डिले, गणेश शिंदे, अक्षय गोरडे, सुनील रोकडे, अंकुश काशिद यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीदरम्यान पक्ष संघटन अधिक सक्षम करण्यावर विशेष भर देण्यात आला. नव्या पदाधिकाऱ्यांवर जबाबदाऱ्या निश्चित करत त्यांना सक्रिय व जबाबदारीने काम करण्याचे निर्देश देण्यात आले. शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा, असे स्पष्टपणे सांगण्यात आले. तसेच बी.एल.ए. नेमणुकीबाबत कार्यकर्त्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शासकीय कार्यालयांमध्ये संघटनात्मक पदांचा योग्य वापर करत सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देणे आणि त्यातून स्वतःची सकारात्मक ओळख निर्माण करणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे एक जबाबदार पदाधिकारी म्हणुन मिरवत असताना आवश्यक असल्याचेही सांगण्यात आले.

मतदार संघात विधानसभा निवडणुकीच्या माध्यमातून राष्ट्रवादी-महायुतीची सत्ता प्रस्थापित झालेली असल्याने राष्ट्रवादी पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्याने आपली नैतिक जबाबदारी ओळखून गावपातळीवरील गटतटाचे राजकारण बाजूला ठेवून उद्याच्या काळात विकासाभिमुख राजकारणाची पायाभरणी करण्यावर विशेष भर द्यावा, असेही आमदार दाते यांनी यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना स्पष्ट केले.

कार्यकर्त्यांना एकजुटीने काम करण्याचे आवाहन करत जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी प्रामाणिकपणा, सातत्य आणि जनसंपर्क या गोष्टींवर भर दिला. या बैठकीमुळे पक्ष संघटन अधिक मजबूत होऊन विकासाच्या कामांना गती मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

> बैठकीदरम्यान संघटन बळकटीसाठी राष्ट्रवादी दिव्यांग सेलच्या अध्यक्षपदी पळसपुरचे रविंद्र धोंडीबा आहेर, तालुका राष्ट्रवादी सहकार सेलच्या अध्यक्षपदी टा. ढोकेश्वर येथील बबनराव पायमोडे सर, सामाजिक न्याय विभागाच्या कार्याध्यक्षपदी वडगाव सावताळचे दत्तात्रय तुळशीराम सरोदे, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उपाध्यक्षपदी अळकुटी येथील सुरेश काशिनाथ परंडवाल, राष्ट्रवादी पदवीधर सेलच्या अध्यक्षपदी धोत्रेचे राहुल सासवडे, पारनेर शहराध्यक्षपदी राजेंद्र औटी आणि उपाध्यक्षपदी सुनील गाडगे यांची निवड करण्यात आली असून या नियुक्त्यांमुळे पक्ष संघटन अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा एक जबाबदार घटक म्हणुन मी अभिनंदन करतो व त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत असतानाच पक्षीय जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडत संघटन अधिक मजबूत करण्याचे त्यांना आवाहन करतो.
>
> **-आमदार काशिनाथ दाते सर, (विधानसभा सदस्य)**

## किनवट आगारात NCMC कार्डासाठी गर्दी

किनवट : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (एस.टी.)च्या NCMC सवलत कार्डासाठी किनवट आगारात प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. मात्र शासनाकडून अद्याप स्पष्ट आदेश असल्याने सवलतींचा लाभ पूर्वी प्रमाणेच आधारकार्ड किंवा इतर ग्राह्य पुराव्यांवर सुरू असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. याबाबत किनवट आगाराचे अधिकारी राजकिरण नेम्मानिवार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, NCMC (National Common Mobility Card) संदर्भात नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असली तरी सध्या कोणतीही सक्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रवाशांनी घाईगडबड करून आगारात गर्दी करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रवाशांना विविध सवलतींचा लाभ

**■ प्रवाशांनी घाई करू नये – अधिकाऱ्यांचे आवाहन**

घेण्यासाठी NCMC कार्ड काढणे सध्या अनिवार्य नसून, पूर्वीप्रमाणे आधार कार्ड तसेच इतर मान्य ओळखपत्रांच्या आधारे सवलती मिळत राहणार आहेत. त्यामुळे अनावश्यक धावपळ टाळावी, असेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, आगार परिसरात वाढती गर्दी लक्षात घेता प्रशासनाने प्रवाशांना संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे. भविष्यात शासनाकडून NCMC कार्डाबाबत नवीन सूचना किंवा बंधनकारक निर्णय घेतल्यास त्याबाबत अधिकृतपणे माहिती देण्यात येईल, असेही सांगण्यात आले आहे. एकूणच, सध्या कोणतीही नवीन अट लागू नसल्यामुळे प्रवाशांनी अफवांवर विश्वास न ठेवता पूर्वीप्रमाणेच सवलतींचा लाभ घ्यावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## विष्णुपुरीची कन्या शितल हंबर्डे यांना 'पीएच.डी.' प्रदान

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुलातील विद्यार्थिनी शितल देविदासराव हंबर्डे यांना इंग्रजी विषयात नुकतीच आचार्य (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली आहे. शुक्रवार, २४ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या मौखिकी परीक्षेत (Viva-voce) त्यांना यशस्वी घोषित करण्यात आले. विशेष म्हणजे, विष्णुपुरी नगरीतून ही सर्वोच्च पदवी संपादन करणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या आहेत. शितल देवीदासराव हंबर्डे यांनी "निवडक नयनतारा सहगल आणि अनिता देसाई यांच्या कादंबऱ्यांमधील लिंगभेदावर आधारित विभाजनाचे चित्रण: एक विषयात्मक अभ्यास"* (Gender-based Segregation in Selected Novels of Nayantara Sahgal and Anita Desai: A Thematic Study) या विषयावर आपले संशोधन सादर केले. त्यांनी आधुनिक काळातील दोन दिग्गज लेखिकांच्या साहित्यातून स्त्री-पुरुष भेदाभेद आणि सामाजिक



**लिंगभेद विषयावरील संशोधनाचे सर्वत्र कौतुक**

विषमतेच्या पैलूंचे अत्यंत सूक्ष्म विश्लेषण केले आहे. या संशोधनासाठी त्यांना डॉ. शैलजा बी. वाडीकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या मौखिकी परीक्षेसाठी बाह्य परीक्षक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. मुस्तजीब खान उपस्थित होते. सदर परीक्षेचे अध्यक्षपद भाषा व वाङ्मय संकुलाचे संचालक डॉ. पृथ्वीराज तौर यांनी भूषविले. या यशस्वी मौखिकी परीक्षाप्रसंगी डॉ. योगिनी सातारकर, उपकुलसचिव मेघश्याम साळुंके, विक्रम पवार, गोविंद हंबर्डे, साईनाथ मामीडवार, सुशील खरवडकर, दासराव हंबर्डे, अरुण भालेकर, शीला भालेकर, बाबू जिंकलोड, मुबीन अन्सारी, विशाल बोरगावकर, दिलीप गरड, रविसिंग तातु यांच्यासह संकुलातील प्राध्यापक आणि शोध विद्यार्थी उपस्थित होते. शितल हंबर्डे यांनी मिळवलेल्या या यशाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. ग्रामीण भागातील आणि विशेषतः विष्णुपुरी परिसरातील पहिली महिला पीएच.डी. धारक होण्याचा मान त्यांनी मिळवल्यामुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे. त्यांच्या या यशाबद्दल शिक्षण क्षेत्रातून तसेच आप्तेष्टांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## नगरसेवक संजय पाटील घंटलवार यांच्याकडून भेट

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त उपक्रमाचे सर्वत्र कौतुक



भोकर : (स. गांवकरी)

भारतीय संविधानाचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरातील शहीद प्रफुल्ल नगर परिसरात एक अनोखा व प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. नगरसेवक संजय पाटील घंटलवार (घोगरीकर) यांच्या वतीने नागरिकांना भारतीय संविधानाची उद्देशिका भेट स्वरूपात प्रदान करण्यात आली, ज्यामुळे या उपक्रमाचे शहरात सर्वत्र कौतुक होत आहे. भारतीय संविधान ही केवळ कायद्यांची चौकट नसून, ती देशातील प्रत्येक नागरिकाच्या हक्कांची, कर्तव्यांची आणि सन्मानपूर्वक जीवन जगण्याच्या अधिकाराची हमी देणारी एक अमूल्य देणगी आहे. ही महान देणगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अद्वितीय बुद्धिमत्ता, परिश्रम आणि दूरदृष्टीच्या जोरावर देशाला दिली. संविधानाच्या उद्देशिकेतून न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूलभूत तत्त्वे स्पष्ट होतात. या चार प्रमुख मूल्यांवर आधारित असलेली ही उद्देशिका प्रत्येक नागरिकाला समान संधी, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि सामाजिक न्यायाची हमी देते. तसेच भारत हा सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताक देश आहे, याची जाणीवही ती करून देते.

नगरसेवक संजय पाटील घंटलवार यांनी या उपक्रमाद्वारे नागरिकांमध्ये संविधानाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा आणि विशेषतः युवकांमध्ये संविधानिक मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश दिला. "संविधानातील मूल्ये केवळ वाचण्यासाठी नसून ती आचरणात आणणे हीच खरी बाबासाहेबांना अभिवादन ठरेल," असे मतही त्यांनी व्यक्त केले.

यावेळी संजय पाटील घंटलवार मित्र मंडळाचे संदीप नरवाडे, संतोष मनमंदे, ज्ञानेश्वर बादेवाड, नागसेन जमदाडे,प्रशांत हानुमंते, ॲड. अंबादास काळे, तुळशीदास बासनुरेआदी कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान या अनोख्या उपक्रमामुळे संबोधि परिसर, शहीद प्रफुल्ल नगर यासह शहरात संजय पाटील यांचे कौतुक होत आहे.

## काका कोयटे यांचा अध्यक्षपदाचा राजीनामा

कोपरगाव : (स. गांवकरी)



महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष म्हणून तब्बल १५ वर्षे कार्यभार सांभाळणारे ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडवली आहे. या फेडरेशन अंतर्गत हजारो पतसंस्था काम करतात. याबाबत सूत्रांकडून समजलेली माहिती अशी, की वयाची ७५ वर्षे पूर्ण झाल्याने आणि प्रकृतीच्या वाढत्या अडचणींमुळे राज्यभर सातत्याने प्रवास करणे शक्य नसल्याचे कारण देत कोयटे यांनी हा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले. वैद्यकीय तज्ज्ञांनी विश्रांतीचा सल्ला दिल्यामुळे पदाचा राजीनामा देणे भाग पडल्याचे त्यांनी सांगितले. फेडरेशनच्या कामकाजावर कोणताही परिणाम होऊ नये आणि संस्थेची गती कायम राहावी, या उद्देशानेच आपण स्वेच्छेने पदत्याग केल्याचा दावा त्यांनी केला आहे. मात्र, या राजीनाम्यामागे केवळ प्रकृतीचा मुद्दा आहे का? असा सवाल सहकार आणि राजकीय वर्तुळात उपस्थित होत आहे. कारण भोंदू बाबा खरात प्रकरणात समता बँकेचा संबंध समोर आल्यानंतर ईडी आणि एसआयटीच्या चौकशीची चर्चा जोर धरू लागली होती. याच पार्श्वभूमीवर फेडरेशनच्या अलीकडील बैठकीत कोयटे यांच्याकडे राजीनाम्याची मागणी झाल्याचे व सहकार भारतीच्या पदाधिकाऱ्यांनीही याबाबत प्रश्न उपस्थित केल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे या घडामोडींना अधिकच राजकीय रंग चढला आहे.

# किनवट नगरपरिषदेत ७५ कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन सुरू

**नगरसेवकाच्या अपात्रतेची मागणी तीव्र**

किनवट : (स. गांवकरी)

नगरपरिषद किनवट येथील पाणी-पुरवठा विभागातील दिव्यांग कर्मचाऱ्यावर झालेल्या मारहाणीच्या निषेधार्थ आजपासून नगरपरिषदेतील तब्बल ७५ कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन सुरू केले आहे. संबंधित नगरसेवकावर गुन्हा दाखल करून अपात्रतेची कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी कर्मचारी संघटनेने केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक 18 एप्रिल 2026 रोजी पाणी-पुरवठा विभागातील सफाई कामगार नरसिंग गंगाराम हे शासकीय कर्तव्य बजावत असताना नगरसेवक अभय नगराळे यांनी शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण केल्याचा आरोप आहे. संबंधित कर्मचारी दिव्यांग असल्याने या घटनेने कर्मचारी वर्गात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

या प्रकरणी नगर परिषद कर्मचारी/संवर्ग कर्मचारी वृंदाच्या वतीने मुख्याधिकाऱ्यांना सविस्तर निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संबंधित नगरसेवकाने शासकीय कामात अडथळा निर्माण केला असून त्यांच्या विरोधात तत्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच त्यांच्या गंभीर गैरवर्तनाच्या पार्श्वभूमीवर अपात्रतेची कारवाई करून त्याबाबतचा प्रस्ताव



जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे पाठविण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, संबंधित नगरसेवक हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते असून त्या पदाचा गैरवापर करून ते वारंवार कर्मचाऱ्यांना धमकावत असल्याचा गंभीर आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे कर्मचारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

कर्मचारी संघटनेने स्पष्ट इशारा दिला आहे की, जोपर्यंत संबंधित नगरसेवकावर कठोर कायदेशीर कारवाई होत नाही, तोपर्यंत कामबंद आंदोलन मागे घेतले जाणार नाही. या आंदोलनामुळे शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता व इतर अत्यावश्यक सेवांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या निवेदनाच्या प्रतिलिपी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच विविध कामगार संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना पाठविण्यात आल्या आहेत. या निवेदनावर किरण कलगोटुवार, रवि उप्परवार, भगवान भंडारे, सुरेश पुसडवार, शेख रियाज, शिवलिंग अन्नेलवार, ललिता करदपवार, आशाबाई दुमखार, राजू पुरनना, संदीप ढंडोरे, अल्ताफ गफुर, क्षितिज समुखराव, अजय मंत्रीवार, नरसा कार्लावार, बाबू कलपेल्लीवार, शामकुमार, स्वामी उशन्ना, शांताबाई दोनकोंडवार, इंदू ढंडोरे, श्रीनिवास माहुरकर, शेख मजिद, राजू कल्पेल्लीवार, रणवीर येरेकर, मनोज साकपेल्लीवार, अनिल अडेल माहुरकर, राजू उदगीरवार, परमेश्वर काचमोडे आदींसह अनेक कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या घटनेमुळे किनवट शहरात खळबळ उडाली असून प्रशासन व पोलिस यंत्रणा पुढील कारवाई काय करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.